म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा.वा.
दा. क्र. ४०६५

दा० क्र - ४०६५.

# भा -गीत

IRBK-0104065
IRBK-0104065

हृदयांतलीं शब्दचित्रं – १

म. ग्रं. सं. ठाणे
विषय बालवाङ्मय
क्र. नं. ४३४

जघल्या-दाहल्या यत्तांसाठीं
पुरवणी वाचन



रघुवीर सामंत

# भाव-जीवन

मूल्य १५ आणे

अमर ज्योति वाङ्मय

ग्रा. नं. १३२८९
२२/१/५२

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. नं. ७७४

हृदयांतलीं शब्दचित्रं-१

# भाव-जीवन

[ नमुनेदार मराठी शब्दचित्रें ]

लेखक

रघुवीर सामंत

[ नवव्या-दाहव्या यत्तांसाठीं पुरवणी वाचन ]

★

—विद्यार्थी मार्गदर्शन—

श्री. रघुवीर सामंत, बी. ए. बी. टी.

[ माजी मराठी अध्यापक, चिकित्सक स.शि. हायस्कूल, मुं. ४ ]

श्री. श्यामराव एस्. पाटकर, एम्.ए., एस.टी.सी.

[ मराठीचे अध्यापक, चिकित्सक स. शि. हायस्कूल, मुंबई ४ ]

अमर ज्योति वाङ्मय

दीपावलि १८७३ ] पुष्प १३ वें [ मूल्य १५ आणे

—अमर ज्योति व

IRBK-0104065

कुमार श्रेणी - ...रंजन

IRBK-0104065

सौ. स्नेहल सामंत, पी. ए.
यांनी
'अमर ज्योति वाङ्मय प्रकाशन' करितां
४बी, हरजीवनदास एस्टेट,
व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई १४,
येथें प्रसिद्ध केलें.

या व पुढील सर्व आवृत्त्यांचे सर्व प्रकारचे हक्क
सौ. स्नेहल सामंत, पी. ए.
संचालक 'अमर ज्योति वाङ्मय प्रकाशन' यांजकडे

श्री. रघुनाथ ज. सामंत, बी.ए.बी.टी.
यांनी
सागर साहित्य छापखाना,
२०, त्रिभुवन रोड, मुंबई ४,
येथें मुद्रित केलें.

हृदयांतलीं शब्दचित्रं-१

# भाव-जीवन

## मंत्र

## (विषय)

ग्रं. क्र. ७३८९ ११।१।८२

या पुस्तकाचें नांव आहे–'**भावजीवन**'! कां बरें ?

ह्या पुस्तकांत तुमच्यासमोर अगदीं मोजक्या शब्दांच्या रूपानें–हलते-चालते प्राणी उभे राहातांना दिसतील. पण त्यांचें दर्शन घडतांना तुम्हाला आणखीहि एका गोष्टीचें दर्शन होईल. तें म्हणजे त्यांच्या जीवनाचें, त्यांच्या आयुष्याचें ! शिवाय, दुसऱ्या एका गोष्टीचेंसुद्धां दर्शन होईल; तें म्हणजे त्यांच्या हृदयांतील–मनांतील भावभावनाचे !–तेव्हां, या संग्रहाला '**भाव–जीवन**' हें नांव कां दिलें असावें ? तें आतां तुम्हाला सांगतां येईल.

पुस्तकाच्या पानावरून जरा एक धावती नजर फिरवूं या—

'**पोट**' मध्यें सोम्याला भूक लागते–त्या भुकेमुळेंच तो अखेर फासां-वर लटकतो. हें त्याचें जीवन कोणत्या कारणानें तसें विपरीत घडत गेलें ?–या बद्दल आपण विचार केला पाहिजे. त्यानंतरचा दुसरा भोळा भावडा '**जीवन**'–त्याला पैशाची श्रीमंती नको होती. त्याला आपल्या जीवनांत जें मिळत होतें त्यांतच तो संतुष्ट होता. कां बरं ? मग 'सुभान्या' कोळ्याच्या जीवनाची '**चाकोरी**' ती सुद्धां जितकी धोक्या दगदगींनी भरलेली आहे तितकीच ती प्रशांत व समाधानी मनोवृत्तीनेहि भरलेली आहे.

'**अप्पाच्या बैलाच्या जोडींत** तुम्हाला 'पशुत्व' दिसेल; पण तें हिऱ्या-सोन्यांच्या भोवतालच्या विचारी माणसांचें ! आणि '**हंबीरचा धनी**' पाहतांना तुम्हाला 'माणुसकी' दिसेल; पण ती त्या हंबीर घोड्याची-! त्याच्या भोंवतालच्या माणसांची नव्हे. त्या त्या भावनांची शब्दांत उभारलेलीं हीं दोन चित्रें तुम्हाला खात्रीने वाचनीय व अभ्यासनीयच वाटतील. ही 'आप्पांची जोडी' काल्पनिक असली तरी महाराष्ट्रांत हजारों रसिकांच्या परिचयाची झाली ती याच कारणानें.

पशुपक्षी कीटकांच्या सृष्टीकडे माणूस जितक्या बेफिकीरीनें पाहतो—वागतांना जितका भावशून्य व अहंमन्य असतो, तितक्याच प्रकारें बेदरकारपणें सत्ताधीश मानवहि सामान्य व सत्तांकित माणसांबरोबर तुच्छतेनें—क्रूरतेनें, स्वार्थी बुद्धीनें वागतानां आढळतो. पण विनम्रता, सुविचार आपल्याला पदोपदीं ग्वाही देतात कीं, प्रत्येक प्राणीमात्राला स्वातंत्र्याचा हक्क आहे, सुखी जीवन जगण्याचा हक्क आहे. जगांत आपलें सुख, आपलें स्वातंत्र्य—दुसऱ्या कोणत्याहि प्राण्याच्या दुःखावर वा पारतंत्र्यावर उभारलेलें असणें हें मोठयांत मोठें पाप आहे. क्षुद्र मुंग्या—पण त्यांच्या इतक्याच डोळसपणें त्याच '**मुंग्यांच्या जगांत**' आपण विनम्र मनानें शिरलों तरच याची आपल्याला जाणीव व्हायची. आणि उच्च आचार–विचारानें आपल्या मनाच्या ध्येयांची पातळी अशी वरवर गेली, तरच विचारांच्या गगनस्पर्शी '**भराऱ्या**' आपल्याला मारतां येतील व आपण आपल्या भोवतालच्या जगाकडे यथार्थतेनें व विहंगम दृष्टीनें पाहूं शकूं; तरच आपलें क्षुद्रत्व आपल्याला जास्तींत जास्त पटेल व आपली–मानव जातीची–खरी प्रगति होईल.

मानवी जीवनांत, मानवी हृदयांतील भावनांत–सर्वांत प्रबळ व खळबळ उडवणाऱ्या भाव–भावना निर्माण करणारे क्षण म्हणजे दोनच—'**जन्म**' व '**मृत्यू**'—स्वतःसकट अगदीं प्रत्येकाचा जन्म व प्रत्येकाचा मृत्यू!—मानवी जन्मापासूनच आशा आपलें जाळें विणूं लागते, विणत जाते. मृत्यूपर्यंत व मृत्यूला धरूनच ती मानवी आशा अखेर अदृश्य होते. माणसाच्या जन्मा-पासून मृत्यूपर्यंत ती आशा अफाट धुमाकूळ माजवत असते. याचेंच प्रतिबिंब तुम्हाला या '**भावजीवना**' तील अखेरच्या दोन शब्दचित्रांत पाहावयास मिळेल.

अशा या मानवाच्या भावना–असें हें मानवी जीवन! या 'हृदयांतील शब्दचित्रां' च्या रूपानें हेंच तें 'भाव–जीवन' तुमच्यासमोर या पुस्तकांत उभें केलेलें आहे. त्यांतील वरले पापुद्रे बाजूस करून, आंत आंत शिरण्याचा, आपल्याहि मनाला त्याची जाणीव मिळवून देण्याचा—प्रचीति आणण्याचा या वाचनात तुम्ही मुद्दाम प्रयत्न करा.

या कलाकृतींच्या वाचनातून आपल्यासमोर हीं जीं सर्वव्यापी तत्वं, हे जे विचार व ज्या भावना उभ्या राहतात व मानवी जीवनाच्या विविध पैलूंचें अंगांचें हें जें दर्शन घडतें—तोच त्यांचा विषय—त्यांचा मंत्र होय. प्रत्येक कलाकृतीला असा एक मंत्र असतो. प्रत्येक कलावंताचाहि असा स्वतःचा एक मंत्र असतो.

## तंत्र–( पद्धति )

प्रत्येक कलाकृतींत जो आधारभूत विषय (—भावना—विचार—तत्व इ. चा ) असतो त्याला आपण मंत्र म्हटलें. ‘ भाव-जीवना ’ चा स्थूल मंत्रहि आपण नुकताच परिचित करून घेतला.

कलावंत आपला हा मंत्र कसा, व कोठून तयार करतो ?

हा कलावंत इतरांप्रमाणेंच आपलें आयुष्य जगत असतो. आणि तसें जगत असतांना त्याला जे अनुभव येतात, जे विचार सुचतात, ज्या प्रबळ भावनांनी त्याचें मन भरून जाते, त्यांनूनच तो आपल्या कलाकृतींचा हा मंत्र तयार करतो. निरीक्षण, आकलन, वाचन, मनन, पचन, रचन, ग्रथन इत्यादि त्याच्या अंगच्या विविध शक्तींचा त्यावर परिणाम—संस्कार होतो. व त्याच्या मनांत वारंवार स्फुरणारा तो मंत्र एक ढोबळ आकार धारण करून प्रथम मनांतल्या मनांतच वावरतो.

पण वाचकांसमोर तें सर्व यथार्थतेनें व स्वतःला जितक्या प्रबळपणें प्रतीत झालें तितक्याच जोरदारपणें मांडायचें कसें ? त्याला विविधदृष्टीनें तयार झालेली एक आकर्षक पद्धति असावी लागते. ही कलाकृति दृश्य मूर्त स्वरूपांत मांडायची जी पद्धति त्यालाच आपण ‘ तंत्र ’ म्हटलें पाहिजे. तंत्र प्रत्येक कलावंताचें निरनिराळें असतें. त्याची स्वतःची अशी एक भाषापद्धति असते. व्यक्तिगत वर्णन-पद्धति असते, विशिष्ट विचार—पद्धति असते. विषयाकडे पाहाण्याचा व तो मांडण्याचा त्याचा स्वतःचा असा एक दृष्टिकोन असतो. या त्याच्या त्याच्या तंत्रावरून म्हणजे कलाकृति मूर्त स्वरू-

पांत मांडण्याच्या त्याच्या पद्धतीवरून आपण त्याला ओळखूं शकतो व तोहि आपली कलाकृति नम्वुन, आकर्षक, हृद्य व हृदयस्पर्शी करून रसिकासमोर मांडूं शकतो.

कलाकृति निरनिराळी सामान्य स्वरूपें धारण करूं शकते व त्यां स्वरूपानुसार आपण तिला लघुकथा, लघुनिबंध, कादंबरी इ. नांवें देतों. हेच ते वाङ्मय प्रकार.

या पुस्तकांतील वाङ्मय प्रकार **'शब्दचित्र'** या नांवानें ओळखला जातो. हा प्रकार मराठींत रूढ करण्याचा सातत्यपूर्ण पहिला स्वतंत्र प्रयत्नया पुस्तकाच्या लेखकांनेच केला आहे. आणि म्हणूनच मंत्राप्रमाणेंच तंत्र या दृष्टीनें आपण यातील प्रत्येकाचा अभ्यास केला तर हें तंत्र आपल्यालाहि हस्तगत होऊं शकेल व आपल्यालाहि त्याच्याहून उत्तम अशी शब्दचित्रें तयार करतां येतील–या वाङ्मय-प्रकाराच्या 'शब्द–चित्र' या नांवांनेच आपल्याला बोध होईल कीं, तें शब्दांत काढलेलें चित्र असतें. रंगरेषा टिंबें इ. साधनांच्या साह्यानें चित्र जसें हुबेहुब, उठावदार व हृदयाला जाऊन भिडणारें असतें, तसेंच शब्दांत काढलेलें हें चित्रहि आपल्यासमोर वर्ण्य विषय हुबेहूबपणें उभें करून, आपल्या हृदयांचा (मोजक्या व यथार्थ शब्दांच्या रूपानें) ठाव घेऊं पाहतें. तें स्वयंपूर्ण असतें, पण संपूर्ण नसतें. केवळ वस्तू, व्यक्ति, प्रसंग, कथानक यांचेंच नव्हे तर हृदयांतील प्रबळ भावभावना, व्यापक विचार यांचेंहि प्रत्यक्षाप्रत्यक्ष साद, पडसाद एखादें आदर्श शब्दचित्र आपल्या मनांत उठवतें. याच दृष्टीनें–शब्दांची निवड, वाक्यांची रचना, वर्णनाची रचना, प्रसंगांची मांडणी, सूचकता, उत्सुकता यांचा पदोपदीं कलापूर्ण मिलाफ, भाव–विचार–प्रवणता इ. गुणविशेष कोणत्याहि चांगल्या शब्दचित्रांत आढळतील. आतां प्रत्यक्ष सोदाहरण अनुभव या वाचनांतून तुम्हाला येईलच.

या सामान्य दृष्टीनें उत्सुक होऊन कुतूहलानें वाचतांना तुम्ही या नऊ शब्दचित्रांचें तंत्रदृष्ट्या जरुर परिशीलन करावें व शिकाल त्याचा तुमच्या स्वतंत्र लेखनांत उपयोग करावा.

## १ पोट—

१ ) 'पोट असलेला प्राणी तो मनुष्य' ही माणसाची व्याख्या पहा. 'गरीबी व तो बालमित्र;' 'सोम्यासारख्यांना दुष्काळ पडला' 'सावकार नि गिधाडं त्यांची पोटं तड्ड फुगलीं'' एकूण त्याला काळीज होतं पण तें उलटं—एवढंच !'—असलीं वर्णनं लक्षांत घ्या व त्यांतून लेखकाला अप्रत्यक्षपणें काय सुचवायचंय् त्याचा विचार करा—

२ ) 'काळ, वारा—भरारतच होतं;' 'आणि हें—अनुभवाचं बोलणं होतं' 'मेल्या मनावर—काय परिणाम होणार ?' 'माणसांचा तो तुरुंग—येत असतात.' असली वाक्यें सोम्याच्या व मानवाच्या भावजीवनांत कशी सहजासहजीं शिरतात तें ध्यानीं घेऊन त्यांचा व्यापक अर्थ जाणा.

३ ) तुरुंग, कायदे, गरीबी–श्रीमंती, भूक यावर प्रत्येकीं १२–१५ ओळींचे स्वतंत्र परिच्छेद लिहा.

## २ जीवन—

१ ) जीवनाच्या खोडी, त्याचा चेहरा-मोहरा, त्याच्या इच्छा–आकांक्षा, त्याचें अज्ञान, त्याचा भाबडेपणा, याबद्दलची माहिती प्रसंगवर्णन करतां करतां कशी विखुर ी आहे तें पहा.

२ ) जीवन, सावकाराचा मुलगा व तोणगा यांचा संबंधी प्रसंग व लग्न-घरच्यां न्हाणीघरांतील नोटांचें पुडकें यांचा जीवनाचा जीवनाशी कसा प्रत्यक्षा-प्रत्यक्ष संबंध येतो ?

३ ) 'बुद्धीपेक्षां हृदयालाच जास्त किंमत.' 'पाठीवरचं नेहमीचंच असतं; हें छातीवरचं ओझं होतं !' या कल्पनांचा स्वतंत्रपणें विस्तार करा.

## ३ चाकोरी—

१ ) 'त्याच्या स्वतःच्या जिवाची–धडपड चालली होती;' 'त्यांच्या संसार नोकेचंहि—होतं.' 'शेंबडी–मलीन अशींच तीं होतीं.—' 'प्रकाशा-साठीं तिथं—मिणमिणत होता—' 'त्याला वैद्यक शास्त्र ठाऊक नव्हतं—'

'युद्धकारणं, राजकारणं-सहस्त्र संशोधनं!'-'सुभान्या सूर्याचं-रस्ता काटूं लागे,' ' आशा! उद्यांची आशा!-हेंच त्याच्या होडीचं होकायंत्र!'-इ. वाक्यांची रचना व आंतील भावना-कल्पना जाणून घ्या. व त्यांचा त्या चित्रणाची पार्श्वभूमी रंगवण्यासाठीं कसा उपयोग होतो तें पहा.

२ )सुभान्याच्या गृहागमनाचें व सायंभोजनाचें चित्र शद्वांत कसें धरून ठेवलें आहे तें त्यांतील सूक्ष्म निरीक्षणांसह अभ्यासा.

३ ) ' विठ्ठलवाडीचा डेलीपॅसेंजर निर्वासित,' ' रात्रपाळीचा गिरणी मजूर' अशा सारखे विषय घेऊन शद्वचित्रें लिहा. नक्कलेपेक्षां स्वतंत्र मंत्र-तंत्र तयार करून वापरा

## ४ पशुत्व—

१ ) उभी काठी, उत्साहाचा झरा, गुरुकिल्ली, आईविना पोर, निर्जीव मोटर, काबाडी गाड्या, घरची ओढ-असली शद्व—योजना आत्मसात् करा.

२ ) प्रेमळ, करडे, शिस्तीचे, कामसू, स्वावलंबी इ. नुसतीं विशेषणें अप्पांना लादलेलीं नाहींत. पण तें तसे आहेत हें शेकडों शद्वांत अधिक उठावदारपणें सांगितलें आहे. म्हणजे कसे? कां?

३ ) त्या त्या संदर्भात खालील वाक्यांची अर्थपूर्णता लक्षांत घ्या— ' टोणग्याला ओढतांना जड पडूं नये म्हणून—' ' कृत्रिमता नि निसर्ग— फरक हा असायचाच—' ' —हिऱ्याच्या मोठ्या बहिणीची दुसरी मुलगी—' '—तुमची तुम्हालाच ती लखलाभ असो—' ' शेपट्या—पराणी मारायला नको!' ' एकदां खोंकून-चौखूर धावूं लागत-' '( भुताटकीनें उकडलेल्या बटाट्यासारखा )—' ' वैद्यबुवा म्हणूं लागले होते—' ' उपाशी मारून टाकाल-मारून-' 'मुक्या हृदयाच्या—धुमसूं लागल्या-" हें मात्र खुद्द त्यांचं त्यांनाच ठाऊक-' '—त्यांत त्याला स्वतःचंच प्रतिबिंब दिसलं असतं—' '—ए ऽ बैलोबा!'

४ ) पाळलेल्या मुंगुसाची गोष्ट, इमानी कुत्रा—अशा जुन्या गोष्टींचा

आधार घेऊन किंवा असलाच एखादा प्राण्याच्या प्रेमाचा काल्पनिक हळुवार प्रसंग घेऊन स्वतंत्र शब्दचित्र लिहा.

५ ) अप्पांबद्दल जास्त कांहीं न सांगतां, थोडक्यांत हें चित्र लिहितां आलें असतें कां ? कां ? कसें ?

६ ) बंडूनाना, अरुण यांचा या शब्दचित्रांत कशाला समावेश ? त्यांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष काय उपयोग ? तो भाग गाळला तर चालणार नाही का ?—

## ५ माणुसकी—

१ ) हें शब्दचित्र रुपांतरित आहे असें वाटतें का ? पण तसें तें आहे. वास्तविक, पोलंडमधला हा प्रसंग; पण हिंदुस्थानांत देखील तो तितकाच नैसर्गिक नि आपलासा वाटतो. कां ?—विश्वव्यापी भावना कशाला म्हणतां येईल ?–माणुसकी म्हणजे काय ?

२ ) पुढील वाक्यांतील सूचकता व उपहासगर्भता लक्ष्यांत घ्या–' त्याल ठार मारणं—होईल. ' ' एरवी अलीकडे–संबंध येत नसे–' ' बाकी साहजिकच आहे म्हणा—' ' हंबीराच्या पेचलेल्या—वाकून पाहात होतं–' ' हजारों जीव जंतु—उड्या घालूं लागले–' ' आणि–आणि–माणसं ? '

३ ) हंबीरला गोळी घालून मारणें चुकलें असतें कां ?—त्याचें मरण अधिक सुखाचें कसें झालें असतें ? झालें तें कसें झालें ? कां ?—

## ६ कीटक-सृष्टि—

१ ) कल्पना विस्तार करा—

' स्वतःच्या पायाखालीं नेहमींच उशीरां लक्ष जातं !—' '–मान जरा नमती केल्यावर कोणालाहि सर्व स्पष्ट दिसूं लागतं ! —' ' त्यांना तें स्वातंत्र्य टिकवायचं होतं—' ' हृदयाच्या हाकेला पुढाऱ्यांची गरज काय ? '

२ ) साध्या प्रसगांतून मोठा आशय काढणें ही एक कला आहे. म्हणजे काय ? अन्योक्ति म्हणजे काय ?

३ ) ' कावळ्यांची शाळा, ' ' बेडकांचें लग्न, ' असल्या काल्पनिक

अर्थपूर्ण प्रसंगांची किंवा ' चोरांची सभा, ' ' मास्तर लोकांचा वर्ग ' असल्या असामान्य घटनांची आवश्यक त्या गांभीर्यानें अगर विनोदानें आकर्षक शद्ब-चित्रें तयार करा.

४ ) स्वातंत्र्यपूर्व काळांतले हें रूपकात्मक शद्बचित्र आहे. पण आज स्वातंत्र्य-काळींहि ते आपणाला हृद्य वाटतें व वाटेल. तें कां ?

## ७ विहंगम दृष्टि—

१ ) या कसल्या मराऱ्या आहेत ? कोणत्या तंत्राच्या आधारें मांडल्या आहेत ?–

२ ) वाक्यांतील अर्थ लक्षांत घेऊन परिच्छेद तयार करा—' माझ्या मळ्याला— नको पडायला मात्र !–' ' मी किती पामर–' ' प्रत्येक मनुष्याला —मरायला नको–' ' सृष्टि बापडी—फुकटच तर !–' '–मानवी स्वार्था-मुळें––मातीमोल होत आहे. ' ' स्वकर्तव्याचें—स्वार्थ आणि विनम्रता !–'.

३ ) मराऱ्या मारतांना अखेर गात्रें शिथील कां झाली ?–डोळ्यांतून. अश्रू प्रवाह सुरू कां झाला होता ? या शद्बचित्राचा शेवट कसा केला आहे ?

## ८ जन्म—

१ ) सिकनोट, कुसाताई घरी नसणं, वरमाईचा विचार, आजीची चिकित्सा, ' पेढे की बर्फी ? ' रमाबाईंचे विन्मुख पतिराज, असल्या कांही विनोदपूर्ण घटनांचा या शद्बचित्रांत कसा उपयोग करून घेतला गेला आहे तें पहा—

२ ) स्वर्गप्राप्ति कोणत्या अर्थानें ?– तुम्हाला स्वर्गप्राप्ति वाटली अशा एखाद्या प्रसंगाचें शद्बचित्र लिहा.

## ९ मृत्यु—

१ ) यांतील सूक्ष्म निरीक्षणाचीं स्थळें शोधा–उदाहरणार्थ—बिछान्यावर पडलेल्या भाऊंचा चेहरा व शरीरयष्टि––

२ ) पुढीलसारख्या वाक्यांनीं वर्णनाला आणलेला उठाव ध्यानीं घ्या

—‘ भाऊंनी प्रस्थान—’ ‘ पिकलं पान—पुरणार ?–’, ‘ स्वतः हालवलेला—दिसत नव्हता ’ ‘ त्याची जीवाबरोबर—झाली—’ ‘ उपहासात्मक ते हंसले–( त्यांनां तसं वाटलं. ),’ ‘ भाऊंचा वेदांत—बोलूं लागला.’ ‘ तूं–तूंच स्वतःची आशा करतोस ?–’ ‘ ते व भाऊ निरनिराळे झाले होते !—’

३ ) आशा शेवटपर्यंत धडपडत होती—हें कशाकशाच्या साह्यानें दाखवलें आहे ? महाप्रयाणानंतर आशा जाते कुठें ?—मृत्यू हें महाप्रयाण कसें ?–

**पार्श्वभूमि—**

( लेखकाचें हितगुज )

प्रत्येक कलाकृतीचा विषय–मंत्र लेखकाच्या मनांत बराच काळ प्रत्यक्षाप्रत्यक्ष घोळत असला तरी त्याला मूर्त स्वरूप येण्यास कांहींना कांहीं तात्कालिक कारण होत असतें उदाहरणेंच पहा—

यांतील **‘सुभान्या–’** शद्बचित्र या नांवानें प्रसिद्ध झालेला लेखकाचा या प्रकारचा हा पहिलाच लेख. त्याच्या यशांतून उत्तेजित झाल्यामुळें त्याच्या पाठोपाठ **‘ शहरचे भाई ’** ( हृदयांतली शद्बचित्रं–२ ) एका मागून एक चित्रित झालें व ‘ शद्बचित्र ’ या मराठींतील वाङ्मय प्रकाराला विशिष्ट स्वरूप प्राप्त झालें. इतरांच्या नव्या प्रयत्नाची त्यांत भर पडली.

**जीवन** हा एक खराखुरा कामकरी गडी होता. त्याचें जगांतलें प्रत्यक्ष जीवन आतां संपलें असलें तरी शब्दरूपानें मात्र तो अजूनहि जिवंतच आहे.

**‘अप्पांची बैलाची जोडी’** काल्पनिक असली तरी अप्पा मात्र प्रत्यक्ष जीवनांत दिसलेल्या दोन तीन करारी वृद्धांच्या अनुभवाच्या मिश्रणांतून समूर्त झाले आहेत. सोळा वर्षें घरांत वावरणारा एक कुत्रा होता. मरतांना धन्याच्या घराला तीन प्रदक्षिणा घालून त्याला ज्या ठिकाणीं रोज जेवण वाढलें जाई त्या मोठ्या कातळावर पुढले दोन पाय व डोकें टेकून त्यानें प्राण सोडला. या अनुभवावरूनच ही बैल–जोडीची कल्पना सुचली. कित्येक वर्षें ती मनात घोळत होती. ‘ लोकशिक्षण ’ कार जांभेकरांना नव्या अंकासाठीं अगदीं तत्काळ शब्द चित्र हवें होतें. म्हणून एका रात्रीच्या तीन चार तासांच्या बैठकींतच तें लिहून

तयार झालें. पण तें शब्दचित्र पुढें फार नांवाजलें. पुष्कळांना आवडलें. दुसरेंहि आश्चर्य असें कीं, या एकट्या लेखानें एका सबंध पुस्तकाच्या उत्पन्ना इतके पैसे आतांपर्यंत मिळवून दिले आहेत.

त्याच वेळीं या '**जोडी**' बरोबर बहुतेक तयार होऊन पडलेलें '**मुंग्यांच्या जगांत**'–त्याची सुद्धां गमतीची पार्श्वभूमि आहे. शाळेंत 'मुंग्या' या विषयावर साहवींत निबंध लिहायला दिला होता. मास्तरांनीं दिलेले मुद्दे न वापरतां, तो लिहिल्याबद्दल लेखकाची त्यांच्याशी थोडी बाचाबाची होऊन त्याला त्यावेळीं शिक्षाहि झाली होती. सहासात वर्षे तो प्रसंग मनांतच विस्मृतपणें पडला खरा; पण मग पुढें हें 'मुंग्यांच्या जगांत' एकाच दोनतीन तासांच्या बैठकीत मूर्त स्वरूपांत अवतरलें. तेंहि त्यावेळीं नांवाजलें. अजूनहि त्याची कांहीं वैशिष्ट्ये वाचतांना प्रतीत होतील.

'जन्म–' 'मृत्यू' चीं चित्रणें तात्कालिक सुख–दुःखाच्या वैयक्तिक प्रसंगांतून उभी राहिली तर 'माणुसकी' हे वाचनांतून स्फुरलें. पण सी. मेंडिस या पोलिश लेखकाच्या ट्वायलाइटचें हें केवळ भाषांतरच नव्हे तर स्वैर-रुपांतर आहे.

असल्या पार्श्वभूमीबाबतच्या वरवरच्या हितगुजावरून तुमच्या लक्षांत येईल–कीं ज्यावेळीं प्रत्यक्ष जीवनांत हे असले अनुभव येतात, त्यावेळीं तें सामान्यच असतात—वाटतात; अगदीं क्षुल्लक वाटतात व बहुधा ते असतात तसे क्षुल्लक असतातहि. पण तुमच्या असल्या क्षुल्लक वाटणाऱ्या अनुभवांतूनहि स्वतःच्या कर्तृत्वाने, कलावंत दृष्टीने त्यावर किमया करून सुंदर कलाकृति निमार्ण होऊं शकतील. तेव्हां या दृष्टीनें तुम्ही स्वतंत्रच प्रयत्न करायला आजच्या आज लागा.

कोणी सांगावें, त्या तुमच्या मनापासूनच्या प्रयत्नांतून आपल्या भाषेतील याहून उत्कृष्ट शब्दचित्र–कलाकृतीहि निर्माण होईल!—

**[हृदयांतलीं शब्दचित्रें–२ (शहरचे भाई) व–३ 'मायेची किमया' या पुस्तकांमधील मंत्र–तंत्रात्मक टिपणें जरूर दृष्टि खालून घाला व फावल्या वेळांत तीं शब्दचित्रेंहि वाचून काढा]**

हृदयांतलीं शद्धचित्रं–१ **भाव-जीवन**


[१] पोट..................(साम्या)
[२४-३-३१]

[२] जीवन................(जीवन)
[४-३०]

[३] चाकोरी.............(सुभान्या)
[४-२९]

[४] पशुत्व.....(अप्पांची
बैलांची जोडी)
[९-३१]

[५] माणुसकी......(हंबीरचा धनी)
[३-४-३१]

[६] कीटक-सृष्टि...(मुंग्यांच्या जगांत)
[४-१-३२]

[७] विहंगम-दृष्टि........(भराऱ्या)
[२४-५-३२]

[८] जन्म.............(स्वर्गप्राप्ति)
[९-२९]

[९] मृत्यू..............(महाप्रयाण)
[१०-२९]

वाचं. ३४

[ १ ]



# पोट

—सोम्या

–१–

भूक व मनुष्यत्व यांचा फार नैसर्गिक नि निकटाचाच संबंध !...पण विषम जगांत ती जास्त जास्त वाढते. शेवटीं, 'पोट असलेला प्राणी तो मनुष्य' अशी व्याख्या होते; आणि मनुष्याला तीच अखेर अमानुष करते !!

सोम्या माणसाच्या जन्माला आला, तेव्हां तोहि माणूसच होता! गरीबी व तो अगदीं बालमित्र; त्यामुळें तिचा सहवास त्याला फारसा जाचक होत नसे. मात्र, 'चांदीचा चमचा तोंडांत घेऊन' माणसं जन्माला कां व कशीं येतात, याची त्याला कधींच कल्पना येत नसे !...तसाच तो जिवंत राहून वाढला; बायको व संसार त्याच्या पाठीमागें लागलीं; आणि त्याला मुलंही झालीं !

...असे कितीतरी दिवस..वर्षं...गेलीं !!

–२–

मग गांवांत एक भयंकर सांथ आली !... त्यांतच दुष्काळ—अर्थात सोमासारख्यांनाच–पडला ! गुरंढोरं सुद्धां पटापट वैरणीविना मरूं लागलीं !! पैशाच्या 'नि माणसांच्या सांपळयांच्या' राशी पडल्या;...सावकार नि गिधाडं यांचीं पोटं तट्ट झालीं !

तें पाहून, सांथीनें एकदम पछाडलेल्या आपल्या कच्याबच्यांबद्दल व बायकोबद्दल सोमाला काळजी उत्पन्न झाली ! आपली भयानक गरीबी

त्याला दिसूं लागली; आणि ( त्याचे सर्व प्रामाणिक प्रयत्न व श्रम निष्फळ वाटतांच ) त्याला ठिकठिकाणची श्रीमंतीही दिसूं लागली !

...गरजू गरीबाला एकदां ऐदी श्रीमंती दिसूं लागल्यावर त्याच्या जीवनांत दुसरं काय व्हायचं ? ?...तेव्हां...

शेवटीं, सोमा तुरुंगांत गेला; (त्याला पाठविला म्हणणंच जास्त योग्य !!)

पण बायको-मुलं तशींच झोपडींत सांथीनें विव्हळत होतीं;...कांही जिवंत नि कांहीं मेलेले सांपळे !

"काय उलट्या काळजाचा हो !... लेकानं..." लोक सुस्कारले !–

म्हणजे ?...एकूण त्याला काळीज होतं; पण ते उलटं; एवढंच !

## –३–

काळ, वारा,...नि मानवी जीवन अव्याहत भरारतच होतं !–

तेव्हां..चार साडेचार वर्षांनंतर—

नंबर ९९९ चे निरनिराळे फोटो घेऊन त्याला बाहेर सोडण्यांत आलं; गांवापर्यंत जाण्याचं तिकीट काढून देण्यांत आलं व बाहेर पडतेवेळीं त्याला थोडा उपदेशही केला गेला !

तरी 'सोम्या बेरडा'ची त्यांना भीति होतीच; एक वॉर्डर दुसऱ्याकडे पाहून म्हणाला, "हरामखोर ! पुन्हां इथं हजर होईल...बघ,...हातकड्यांत !... ...पहा थोड्याच दिवसांत"......

आणि हें त्याचं बऱ्याच वर्षांच्या अनुभवाचं बोलणं होतं !

तसं बाहेर पडल्यावर...सोम्याला बरं वाटलं व वाईटही वाटलं ! पुन्हां जगांत आल्यासारखं वाटल्यामुळें समाधान झालं ! आणि आंत पोटभर खायला तरी मिळत होतं...हें आठवून, तीन दिवसांच्या उपाशीं सोम्याला वाईटही वाटलं !

त्या सांथींत अखेर पोरंबाळं गडप झाल्याची बातमी त्यानें तुरुंगातच ऐकली होती; त्यामुळें, आतां तो जगांत एकटाच,...हें समजावयासहि त्याला फारसा वेळ लागला नाहीं !

आणि बाहेर म्हणाल तर–कुठंही...तो लोकांना 'सोम्या बेरड'च होता !

–४–

"काय बिनकाळजाचा माणूस होऽ !...त्या नीचानं, पंधरा दिवस नाहीं झाले सुटून, तों आतां तर केवळ पोट जाळण्यासाठीं खूनच केलान् एकाचा !"

पण...पण...सोम्या 'उलट्या काळजा'चा म्हणूनच मागं तुरुंगांत गेला होता;...( त्यावेळीं लोकही म्हणाले त्याला तसं !!... )

एकूण तो तुरुंगाबाहेर पडला, तेव्हांच असा 'बिनकाळजा'चा झाला असावा !...दुसरं काय ?...

सोम्या मग पुन्हां हातीं लागला ! नि अपेक्षेप्रमाणें, ( हातकड्यांत ) त्या तुरुंगामध्येंच 'तो परत गेला.' वॉर्डरचं भाविष्य खरं ठरलं ! — झोंपाळू समाजानेंहि आपल्या जीवन–चरित्राचं आणखी एक पान बेफिकीरपणें उलटलं, नि...तो फिरून घोरूं लागला !...

–५–

फांसाची ठरली तारीख तेवढी अजून यावयाची होती !—

त्याच सुमारास दोन राष्ट्रीय तरुण शांतपणें फांसावर लटकल्याची बातमी त्याच्या अंधेऱ्या कोठडींत त्याला समजली !...मेल्या मनावर आणखी निराळा तो काय परिणाम होणार ? शरीर जिवंत असलं म्हणून काय झालं ?

त्याच्या दुसऱ्याच दिवशीं, कांहीं वेळ आगाऊ सांगून, कोठडींतून त्याला बाहेर काढण्यांत आलं ! हो, आणि—

आणि त्याच फांसावर, ठरल्या दिवशीं, ठरल्यावेळीं, ‘ उलट्या ’ किंवा ‘ बिनकाळजा ’ चा सोम्या, न्यायाधीशाच्या इच्छेनुसार, ‘ मरेपर्यंत लटकला ’!!

—६—

तेव्हां माणसांच्या जन्माला आलेला सोम्या, ‘ अमानुष कृत्य करून ’, असा जगांतून तडकाफडकी गेला!

ते दोघे तरुणही ‘ अमानुष ’ ठरले होते; इतर सारीं मात्र माणसं होतीं, म्हणे!...हाच तो जगाचा नीति-निर्णय!...

माणसांचा तो तुरुंग मात्र तिथंच असून त्यांत लोक आजहि जात येत असतात!!...

आणि फांस व त्या खालची ती फळी, ‘ अमानुष ’ कृत्यं करणाऱ्यांना जवळ घ्यावयाची अजूनहि वाट पहात आहेत!!! हो, आणि...

आणि मानवी जातीचा ( गोंधळी ) व्यवहार अजूनहि तसले अमानुष प्राणी त्या परंपरेला पुरवण्यासाठीं सदैव सिद्ध आहे!!—

पोट ??...

भूक !!...




[२]

—जीवन

—१—

" औदा मायं यगीन कयाचां ! " तो बोबडा बोले.

" पैसे रेऽकुठून आणणार लग्नाला ? "

" तुह्यां पायीं हायेत ना ? ॲहॅ, ॲहॅ,... " तो खांदा उडवत हंसे.

" तुला रे कसले पैसे द्यायचे ? कशावर ? तूं फेडणार कसे ते ?"

" चाकयी कयीन ना तुज्याकय !" त्यानें ढोपर खाजवीत हमी दिली.

" न् पळालास तर ?..."

" नायी नायी ये पयाचा ऽ मी ऽ ! " त्यानें जास्त बोलून दाखविलं नाहीं. फक्त तो शेटच्या पायां पडला.

फेंगडा, काटकोळा, थोडासा अशक्त, वेडपट !..वारल्याची जात म्हणून काय झालं ?...देतो कोण त्याला चांगली मुलगी ? मिळाली त्याच्यासारखीच एक मेंगळीं,...बावळट...

आणि मग लगीन झालं;...तेव्हां गडी खूष झाला;...आणि शेटला बायको दाखवायला आणली...

" आतां तूं बायकोवाला झालास, जीवन...!"

" हां ! ॲहॅःऽॲहॅः... " नेहमींच्या पद्धतीनें गुडघा खाजवीत तो मोठ्यानें हसूं लागला.

" तिला तूं पोसणार आहेस कशी रेऽ ?...न् उद्यां दोनं पोरं झालीं मग ?"

" तूं हायस ना ! "

आपल्या सावकाराला तो प्रत्यक्ष देव समजे!—

—२—

आणि दोन दिवसांनीं जीवन बायकोसह आला. सावकाराच्याच वाडग्यांत त्याचं बिऱ्हाड...

त्यांच्या वारली जातीच्या सर्वसाधारण लोकांपेक्षां जीवन अशक्तच; 'डोकी' केलेलं तुळतुळीत डोकं, चपटसं नाक, त्यांतून मिशांशीं सख्य करावयास बाहेर येणारे केस, लहानशा मिशा, पिवळे व थोडेसे पुढें आलेले दांत;...नेहमीं हंसतमुख असल्यामुळें, ते जास्तच ठळकपणें दिसत असत.

वाढलेली दाढी त्याच्या काळ्या रंगावर फारशी दिसून येत नसे ...... (अन् तें एका अर्थी बरंच होतं;...दर महिन्याला सावकाराच्याच चवलीनें खेड्यांतल्या ठरलेल्या न्हाव्याकडून 'डोकी' बरोबरच त्याला हक्कानें दाढी तासून घायला मिळे.)

कुठं बाहेर जाते वेळींच अंगांत बंडी; नाहींतर नेहमीं उघडाच. कमरेंतील करगोट्यांत अडकवलेली एक मोठीशी मांजरपाटाची पण मळकट झालेली लंगोटी! तेंच काय तें अब्रू सांभाळण्याचं त्याचं एकमेव साधन!

सावकाराच्या धाकट्या मुलाला दोन महिने 'शिरी' घोटाळतांना तो रोज पांचपांच मिनिटं पाही. कधीं कधीं सावकाराला 'यस् यस्' करतांनाहि ऐके. 'हें काय गोडबंगाल?' या बाबतींत त्याचं डोकंच चालत नसे; त्याच्याहिशेबीं सावकार हा सर्वज्ञच!

कांहीं ना कांहीं सारखा काम करी, तरी पण तो जरा मंदच; त्याला समजण्याचीहि अक्कल तेवढीच; पुरता सांगकाम्याही नव्हता बेटा! सावकाराचीं ढोरं सांभाळणं हें त्याचं मुख्य काम! आणि एक काम करायला त्याला कमींत कमी चारदां तरी ओरडावं लागे.

१३२५ ११।११५२

—३—

" अरे जीवन, तोंडगाऽ जूप रहाटाला ! " शेटचा मुलगा ओरडला.

गोठ्यांत जाऊन जीवन सावकाश तोंडगा सोडीत होता. तोंपर्यंत इकडे चारदां हांका मारून झाल्या होत्या. त्यानें तोंडग्याच्या पाठीवर थाप मारून कुंडीवर त्याला ' पाणी दाखवलं. '

" अरे जीवन तोंडगाऽ " सावकाराचा खव्याळ मुलगा अर्धवट थांबला.

जीवनाला समजलंच नाहीं. त्याचं लक्ष तोंडग्याकडेच होतं.

" जीवन तोंडगा, जूप..." धाकला शेट कुंडीजवळ येऊन हंसत म्हणाला.

" पानी खातोय् ना त्योऽ ! " त्याच्याकडे पहात हंसत म्हणून जीवननें तोंडग्याला पुन्हां थाप मारली.

अरसिक जीवनचा राग येऊन, सावकाराचा मुलगा पुन्हां म्हणाला, " अरे,, जीवन तोंडगा—जूप..."

" ॲहॅः ॲहॅः ॲहॅं ! जीवन नायीं तोंगाऽ ! योऽऽतोंगा ! " नेहमींच्या पद्धतीनें हंसून गुडघा खाजवीत तोंडगा दाखविण्यासाठीं मान पुढं करून जीवन म्हणाला. आतां कुठं त्याच्या ध्यानीं आलं होतं तें ! ' जीवन तोंडगा !...'

पण तोंडगा म्हटलं म्हणून तो तोंडगा थोडाच होतो ?...तो सावकाराचा मुलगाहि शिकत नसे. म्हणून त्यालाहि सर्व विचारीत,—" काय रे, तूं जीवन होणार का ? "

पण खरंच ! तोंडग्यांत न् जीवनमध्यें काहींच का फरक नव्हता ?

—४—

" जीवन, मुंबई पाहिली आहेस का रे ? "

" नायीं बा ! ॲ हॅः ! " ठराविक पद्धति...

"एवढा 'बाप्या' झालास् न् अजून नाहीं पाहिलीस मुंबई ? तुझं वय रे काय ?"

"कोऽनाय् ठाव् ?...असाऽदीस व्हता तवां जयमयोय् .." तो पटकन् हातवाऱ्यासह बोलूं लागे.

"चल्, ती बडबड नको तुझी ! मुंबईला नेहमीं कशी गंमत असते आहे कां ठाऊक ?"

"जत्ये सायकी ! अॅं हॅं..."

"हंऽहं ! जत्रेसारखीच ! अगदीं बरोबर !"

"आज हाये ना शितयादेवीची जत्या !" त्याला मुंबई नको होती.

"तूं जाणार कां रेऽजत्रा बघायला ?"...

"पैस पायजेत ना ? अॅं हॅं..." त्यानें खांदा उडवला; गुडघा खाजवला.

"पैसेऽ ?...कितीसे रे ?"

"चार सा आनं देस !" त्यानें डोक्याला फडका गुंडाळला. हो, अगदीं लागलींच जायच्या तयारीनें.

जत्रा म्हणजे जीवनची चंगळ ! चांदण्यांत गप्पा मारत चालत जायचं; तिथं देवीचं दर्शन घ्यायचं; एक दोन आण्याचे डाळ–चुरमुरे प्रसाद म्हणून घ्यायचे;...एक दोन आण्याचीं पोरांना शिट्या पेपेरीं खरेदी करायचीं; एक दोन आण्याचा उसाचा रस-मग बोलत बोलत चणे खात घरीं फिरायचं !...

गरीबांनाच जास्त हौस असते;...त्यांनाच देव काय तें चांगलं समजतं.

खरंच ! बुद्धीपेक्षां हृदयालाच जास्त किंमत ! !

—५—

आज जीवनची कोण धांदल ? सावकाराच्या मुलाची मुंज !...कुठून कुठून,...बोलावण्याप्रमाणें लोक आले होते !

आधींच अशक्त व मंद...त्यांतून आज तर जास्तच घाई ! तो लवकरच धांवपळीनें थकला-भागला !

त्याच्या त्या धडपडीचं कोण कौतुक करणारं होतं ?

मध्येंच एकदां अंघोळीच्या खोलींत तो कशासाठींसा गेला; कोनाड्यांत त्याला एक पुरचुंडी दिसली !...त्यानें ती हातीं घेतली.

जो तो आपापल्याच गडबडींत...त्याच्याकडे कशाला कोण लक्ष देणार ?

त्यानें ती उघडून पाहिली. दहा दहाच्या सहासात नोटा व कांहीं किरकोळ रुपये !... बापजन्मीं त्यानें इतके रुपये एके ठिकाणीं पाहिले नव्हते. त्याला ते मोजतांच येईनात. विसापर्यंतचे आंकडेहि त्याला धड मोजतां येत नसत !

आधींच तो दमला भागलेला;...त्यांत ही नवी भानगड ! ...त्याला कांहीं सुचेचना;...तसाच शेठाणीकडे धांवत गेला तो—

" वयनीऽ ये वयनीऽ ! " तो धांवा टाकीत ओरडलाच.

" ये बग काय ? " हातांतील पैसे पुढें करीत तो म्हणाला.

" कायरेऽ घाईच्या वेळीं काय तुझा त्रास ? " वहिनी आपल्याच कामांत...

" हे...म...त्या खो–खोयींत...मया सापयये ! " आधींच बोबडा, त्यांत त्याची इतके पैसे पाहून घाबरगुंडीच उडाली होती. " को...कोनाचे हा... हायेत ?...ब...बग व...वयनी..."

पैशाकडे वहिनीचं लक्ष जातांच तिनें झटकन् आपले हात पुढें केले. त्यांत त्यानें तें नोटांचं पुडकं टाकलं.

" कोणाऽच्चेऽ बाबा हेऽ, जीवन... ? " असं आश्चर्यानें म्हणत म्हणत ती चौकशी करायला आपल्या यजमानांकडे गेली.

जीवनला सुद्धां एकदाचं हायसं वाटलं. पाठीवरचं नेहमीचंच असे. हें छातीवरचं ओझं होतं;...तें गेलं ! हुश्शऽ...

शेवटीं, पैशाचा मालक सांपडला. कोण हरीचा लाल होता कोणास ठाऊक ? आठ आणे सुद्धां काढून त्यानें जीवनच्या हातावर ठेवले नाहींत !!

पैशानें नव्हे,...पण शब्दानेंही कोणी जीवनचं कौतुक केलं नाहीं. तिघा–चौघांशिवाय कोणाला हें ठाऊकही नव्हतं !...

–६–

"अरे जीवन तोंडगा,...जूप" सावकाराचा मुलगा येऊन घाईनें सांगूं लागला, "रहाट चालूं दे. पुष्कळांच्या आंघोळी व्हायच्या आहेत अजून ! अशा घाईच्या वेळीं जलद नाहीं काम करणार तर केव्हां ?"

तरी त्याला आपला ठरलेलाच वेळ लागला !...तोंडगा पाणी पीत होता.

"अरे जीवन तोंडगा... "

"नायी नायीऽ,...जीवन नायीऽ तोंगा ! योऽऽ तोंगाऽ! ! अँहं: अँहं:..."

तो नेहमींसारखा हंसत लंगडत लंगडत तोंडग्याबरोबर चालूं लागला.

आणि खरोखरच जीवन तोंडगा नव्हता ! जीवन तोंडगा ??...आणि ते पशू तरी त्यांच्यांतील कमी प्रतीच्या एखाद्याला, शिवी म्हणून,...'माणूस' असं कशावरून संबोधीत नसतील ?

"काय जीवऽन ?"—"वोऽऽ"

"कसा हाये ?"— "बया हाय् !"

"ही रे कोण ?" — "कोनची यी ? यी माजी मुयगी ! न् यी गोवायाची ?"

त्यानें आपल्या पाठीवर खेळत असलेल्या नागड्या मुलीला एका हातानें कडेवर घेऊन दुसऱ्या हातानें शेणी घालण्याचं काम पुढें चालूं केलं.

"तिच्या अंगांत कांहींच घातलं नाहींस रे अगदीं ?"

" काय कयाच कपय ? अँहँ: अँहँ: !"...तो हंसत म्हणाला; या चौकशीचं त्याला आश्चर्यच वाटलं असावं !

" वेड्या, आजारी पडेल ना ती !... "

" नायी पयाची !...कापयाया पैसं पयतात ना ?..."

कालचे पैसे काय कमी होते ? त्याला जन्मभर पुरते !

पण ते नको होते त्याला !!......

तो सावकाराच्या 'अडोसरी'वरच खूष होता !!!

—७—

जीवनचं जीवन...असंच चाललं होतं !

बायको, तीन पोरं. स्वतःचं पोट !...आणि तसाच त्याचा जन्महि जाणार होता बहुतेक......


त्याच्यांत कितीतरी खोडी होत्या;...तो...कुचकामाचा,...तो...पण कशाला ? हें सर्व त्याचं त्यालासुद्धां समजत होतं...न् यांतच मोठेपणा...

एखादा गुण माणसांना दिसत नाहीं. पण म्हणून तो नष्ट होत नाहीं- !!

...माणसांना नाहीं त्यांची किंमत चांगली कळत;...पण स्वतःच्या लेकरांचे दोष कोण विसरत नाहीं ?

हा जीवन असा !...त्याचं जीवन हें असं ! —नि जग हें असं !

[३]



# चाकोरी

—सुभान्या

—१—

आपल्या मळकट कुडत्याच्या आंतल्या खिशांतून त्यानें तंबाखूची पुडी काढली. खिशांतील आपट्याचीं दोन पानं काढून तीं त्यानें आपल्या जिभेवर फिरवून ओलीं केलीं. तीं एकावर एक ठेवून थोडीं पुढं मागं सरकवलीं; नि त्यांत पुडींतील ' तमाखू ' घालून त्यानें ' वावली ' वळली. उजव्या खिशांतील ' चकमकी ' नें ती पेटवून दोन चार झुरके घेतल्यावर त्याच्या दमल्या भागल्या जीवाचं पूर्ण समाधान झालं! त्याला नवा जोम आला!

आणि नवीन जाळं टाकण्यासाठीं त्यानें अथांग सागरावरली आपली लहानगी होडी आणखी आंत ढकलली......

' वलव वलऽव वलकाऽरी !' तो आपल्या भसड्या सुरांत गात होता. हातानें होडी वल्हवीत होता. निदान त्याची तरी त्याक्षणीं त्यानें करमणूक होत होती!

त्याला पाहिजे होती ती जागा आली! तो थांबला. त्यानें आपलं जाळं समुद्रांत फेकलं व तें नीट पसरण्यासाठीं आपली होडी सभोंवार फिरवली.

तो थोडा वेळ वाट पहात राहिला.

त्याला सूर्य बुडतांना दिसला. तो हंसला.

त्याची घराकडे फिरण्याची वेळ झाली!...

—२—

त्यानें जाळं ओढलं. सांपडलेल्या माशांच्या जिवाची, जिवासाठीं प्रचंड...

बेफाट...घडपड चालली होती !

त्याच्या स्वतःच्या जिवाची पण त्याक्षणीं तशीच सारखी प्रचंड धडपड चालली होती.

त्यानें ते मासे काढून आपल्या मडकींत टाकले व त्यांवर झांकण ठेवलं. जाळं ठिकाणांवर ठेवून त्यानें होडी परतविली. घराकडे परत फिरण्याच्या आनंदानें तो पुन्हां मोठ्यानें गाऊं लागला.

समुद्राच्या असंख्य लाटांनीं त्याची होडी सारखी हेलकावे खात होती. तरी तो ती वल्हवीत होता, म्हणूनच ती ठरावीक दिशेनें चालली होती; नाहीं तर ती कुठच्या कुठं बहकली असती.

त्याच्या संसारनौकेचंही सगळं असंच होतं !...

गातां गातां केव्हां किनारा आला तें त्याला समजलंसुद्धां नाहीं.

त्यानें होडी पाण्यांतून वर ओढली; जाळं व मडकं खांद्यावर टाकलं; नि रस्ता कांटायला सुरवात केली.

—३—

सूर्य आतां साफ मावळला होता. साधारण अंधुक अंधुक दिसत होतं. आपल्या घराच्या दिशेनें तो वृक्षहीन वाळवंट तुडवीत चालला !

त्याचा संसारहि कांहीसा असाच रुक्ष होता का ?

झोंपडं दिसूं लागलं. त्याचा आनंद गगनांत मावेना.

त्याची दोन्हींतीन्हीं पोरं त्याला पाहतांच त्याच्याकडे धांवत सुटलीं ! शेंबडीं, मलीन अशींच तीं होतीं.—तरी पण तीं त्याचींच मुलं ना ?

खांद्यावरील मडकं व जाळं त्यानें जमिनीवर ठेवलं; प्रत्येकाला पाळीपाळीनें उचलून, त्यानें त्यांचे मटामट मुके घेतले;..नि सर्व लटांबरासह तो घराकडे आला.

गिरजी आपल्या कामावरून नुकतीच परत फिरली होती.

तीही दमली होती. पण नवऱ्याचे श्रम पाहून ती आपले विसरली.

थोड्या वेळानें जेवण तयार झालं! ती हंसतमुखानें आपल्या घरधन्याला म्हणाली, "भाकर खावाची नाय्?"

—४—

सुभान्या आंत गेला. जाळं एका कोंपऱ्यांत टाकून, माशांचं मडकं त्यानें बाहेर आणलं. नारळाच्या करवंटीला दांडा लावून केलेल्या डावेनें त्यानें अंग धुण्यास सुरवात केली.

त्याची ती पिळदार शरीरयष्टी व झुपकेदार मिशा त्याच्या एकंदर कण-खरपणांत भरच टाकीत होत्या.

पांचसांत मिनिटांत त्यानें आपलं स्नान संपवलं. अंग पुसून त्यानें काळ्या रेघांचा तांबडा फडका गुंडाळला. आपल्या झोंपडीत जाऊन तो चुलीजवळ एका पाटावर बसला.

काळ्या मातीच्या एका ताटांत गिरजेनें तिखट, स्वतः आणलेल्या ताज्या मास-ळीचं 'कोरड्यास', कांदा व चारपांच भाकऱ्या, ..असे सर्व जिन्नस वाढून दिले.

प्रकाशासाठीं तिथं एक दिवा मिणमिणत होता.

गिरजेनें चुलींत चार 'सुक्या काड्या' टाकल्या होत्या. त्यांची 'उदबत्ती' दरवळत होती. आणि त्या वासावरच सुभान्या चार घांस जास्त जेवला असता.

बायकोचा थोडासा आग्रह झाल्यावर त्याचं जेवण संपलं.

त्याला वैद्यकशास्त्र ठाऊक नव्हतं. त्यानें जेवणावर पाण्याचा सबंध तांब्या घशाखालीं उतरविला!...

—५—

जेवून झाल्यावर ढेंकर देत देत, त्यानें पुन्हां 'वावली' वळली व पोरं झोंपलीं होतीं त्यांच्याच जवळ त्या फाटक्या चिरगुटांवर तो बसला.

गिरजेचं घरांतील काम संपतांच तीहि बाहेर आली.

त्यांचा बराच वेळ मासळीच्या विक्रीचा हिशोब चालला होता.

जगांत पुष्कळ भानगडी चालल्या होत्या ! युद्धकारणं, राजकारणं, समाजकारणं, कलाचित्रणं, प्रेम-प्रकरणं, रुक्ष व्याकरणं, सहस्र संशोधनं...! त्याला त्यांतलं एकही ठाऊक नव्हतं.—आणि एकही समजून घेण्याची त्याची इच्छा नव्हती.—शिवाय त्याला तेवढा वेळ तरी कुठं होता ?? दिवसामागून रात्र व रात्रीमागून दिवस–हेंच त्याचं सदाचं जीवन–चक्र.

हिशेब संपल्यावर तो व त्याची बायको झोंपीं गेलीं.

त्याला पांच मिनिटांत गाढ झोंपहि लागली. दिवसभराचे त्याचे श्रमच तसे अफाट होते !...

शिवाय घरांत चुलीजवळच्या चारसहा लहान मोठ्या गाडग्यांशिवाय व पोरं-बाळं नि आपण झोंपायच्या चिरगुटांशिवाय त्यांच्याकडे जास्त होतं तरी काय ?

उरावर कसलंच चिंतेचं ओझं नव्हतं;...मग सुखानें झोंप कां लागूं नये ??

आयुष्यांतील एक दिवस तर गेला ! उद्यांची बात उद्यां !!

आणि इकडे उद्यांची आहे कोणाला एवढी काळजी ? —' आज ' मधून तर गरीबीत कां होईना पण अब्रूनें बाहेर पडलों.

झालं तर ! संपलं आपलं कर्तव्य. ' पुढली काळजी ईश्वराला ! '

—६—

" कॉक्-कॉ-कॉक्-कॅ ! "; ' पहिला कोंबडा ' आरवला. आणखी थोड्या वेळानें ' दुसरा कोंबडा ' झाला–" कॉक्...कॉ...कॉक्...कॉ..."

कोंबडा हेंच त्यांचं घड्याळ ! पण घड्याळवाल्या लोकांपेक्षां तेंच जास्त वक्तशीर ! तेच जास्त आस्थेवाईक !...

सुभान्या उठला. गिरजी उठली. कामाची निरवानिरव सुरु झाली.

गिरजीनें नवी भाकर व कोरड्यास केलं. दुपारची न्याहरी बांधून तयार होईपर्यंत सुभान्या आपलीं कामं संपवून आला.

थोड्या वेळानें तांबडं फुटूं लागलं. त्यानें न्याहरी केली.

तोंच...सूर्य वर आला. तो आपला रस्ता काटूं लागला.

तरी पोटाची काळजी 'नसलेले ऐदी आयतोबा अजून गाद्यांमध्यें लोळत होते. पण प्रत्येकाचंच तसं नसतं!– सुभान्या सूर्याचं अनुकरण करून स्वतःचा रस्ता काटूं लागला!

जातांना त्यानें आपल्या पोरांकडे पाहिलं. तो लांब जाईपर्यंत गिरजी दारांत हंसतमुख उभी होती.

तिलासुद्धां मासळी घेऊन बाजारांत जायचं होतं; पण वेळ होता.

–७–

सुभान्या झोंपडी दिसेपर्यंत दोनतीन वेळां मागं वळून पहात होता.

कालचं संध्याकाळचं वाळवंटच तो तुडवूं लागला;...पण कालच्यासारखी त्याला जवळच दिसणारी आशाचंद्रिका नव्हती.

आपली होडी त्यानें नेहमींसारखी समुद्रांत ढकलली––


तेथपर्यंतच काय ती हृदयांतली कालवाकालव! समुद्राच्या लाटांबरोबरच त्याच्या हृदयांत आनंद व आशा यांच्या लाटाहि पुन्हां उचंबळूं लागल्या.

बरोबरच आहे! एकदां नांव आंत ढकलली खरी! आतां अर्थात् पुढचा विचार!–मागचा...घरापोरांचा नव्हे!...

संध्याकाळपर्यंत सुभान्याचं असंच चालावयाचं होतं!

आणि नेहमींचाही कार्यक्रम असाच!!––

आशा!...उद्यांची आशा!!– हेंच त्याच्या होडीचं होकायंत्र!... ध्रुवतारा!...सुकाणूं...नि...शीड!!...!



[४]

# —अप्पांची बैलांची जोडी

—१—

जवळजवळ ऐंशीच्या घरांत वय गेलेलं; पण अप्पांचं शरीर म्हणजे नुसती उभी काठी! अन् चालणं तरी किती भरभर! उत्साहाचं वारं अंगीं जणूं काय पुरेपुर भरलेलं! अप्पा म्हणजे उत्साहाचा झराच...

म्हातारा उद्योगीही जबरा! कामांत काम करण्याची मोठी हतोटी त्यांची; पुन्हां सारे होतां होई तों स्वतः करायचं! सूनबाई न मुलगा न् गडी... कोणाची मग मिजास नको चालायला मागून!

थंडी असो कीं महाथंडी असो, दुसऱ्या कोंबड्यानंतर अप्पा कधींच पडून नाहीं राहायचे अंथरुणांत. प्रातर्विधि आटोपले कीं तोंडानें भूपाळ्या गुणगुणत, खराट्यानें मागच्या पुढच्या अंगणांतील किंवा माजघरांतील केर काढायला त्यांची सुरवात व्हायची! नातवांचे—स्वतःचे लहानमोठे कपडे धूत बस; घराभोवतालचं गवतच काढायला घे...त्यांना एकंदरींत पुष्कळ उद्योग सांपडत!

—२—

स्वावलंबन ही अप्पांच्या आजपर्यंतच्या आयुष्यक्रमाचीच गुरुकिल्ली!

कोल्ह्याचोरांच्या भीतीनें कुठं वाड्याच्या वईला झालेली 'गोपटीं'च नीट करून घे;...टोणग्याला ओढतांना जड पडूं नये म्हणून पाण—रहाटांतच

वंगण घाल; पाण्याची कुंडी नाहींतर 'चोप'च खराट्यानें धुत बस; विहिरींत सोडलेली बांड्यांची माळ नीट करून घे; आवारांतले बांध भरून काढ, कुठं आंब्याच्या कलमांनाच कुटा-खत घालायला लाव,..असं त्यांचं कांहींना कांहीं तरी सारखं चाललेलंच असायचं !

अगदीं कांहींच नाहीं तर वेळ आल्यास चिंचेची शिपटी घेऊन, 'याऽऽऽ पप्पऽऽ!' करीत पाणरहाटाचा टोणगाहि स्वतः हांकायला त्यांना लाज वाटत नसे !

आणि 'डोक्रा' स्वतःच काम करीत असला म्हणजे गडीही मोठ्या उत्साहानें करीत असत ! मात्र सणावाराला पक्वान्नं किंवा आंब्याच्या दिवसांत आंबे खातांनाहि अप्पा आपल्या गड्यांना विसरत नसत ! 'वावली' साठीं 'तमाखू'ही ते रोज अगदीं नियमानें वांटीत त्यांना !

–२–

शहरांत श्रीमंती–सुख पैशावर ! पण खेडेगांवांत मिळणाऱ्या वस्तूंवर नि आनंदावर ! कृत्रिमता नि निसर्ग यांत एवढा फरक हा असायचाच !

पण वेळच्या वेळीं काम होण्यावरच मात्र 'वागडो'चा कटाक्ष ! त्यामुळें गडी तसे वचकून असले तरी अप्पांबद्दल त्यांना एकूण फार प्रेमच वाटे !

पण अप्पांना जनावरांची भारी हौस ! त्यांचा गोठा नेहमीं दुभत्या गायी-म्हशींनीं अन् तयार गोऱ्यांनीं-बैलांनीं भरलेला असे; आणि त्यांची निगाहि त्यांनीं तितकीच आस्थेनें राखावी.

'त्यांना धू रे, चरायला ने रे, पाणी दाखव रे, गोठा साफ कर रे......' असे त्यांचे दोन गडी जनावरांमागेंच असत सारखे काम करीत !

आपल्या सारवटगाडीच्या बैलजोडीची मात्र ते स्वतःच विशेष काळजी घेत.

"माझी ही हिऱ्या-सोन्यांची जोडी म्हणजे सारी हिऱ्यासोन्याची संपत्तिच आहे माझी संपत्ति !" त्यांना थोपटीत अप्पा मोठ्या अभिमानानें म्हणत.

—४—

सहज त्यांना कोणीं प्रश्न विचारावा, "कुठुन हो पैदा केली ही जोडी तुम्हीं अप्पा? फार त्रास घेतां बुवा तुम्ही यांच्यापायीं, अशा म्हातारपणींसुद्धां!"

"हंऽ चाललंय्...अरेऽ आईविना पोरं आहेत ही, बाबा!" ते एखाद्या माणसाविषयीं बोलणं चालल्याप्रमाणें सुरवात करीत; अन् पुढंही ते अगदीं सबंध इतिहासच सांगत एकेकाचा!

"घराचाच होऽ 'खोंड' हा! माझ्या डोळ्यांदेखत लहानाचा मोठा झाला! ह्या हिऱ्याची आई...त्या शिवा पाटलाच्या गोठ्याला आग लागली होती, त्यांतून कशीबशी जळलीपोळलेलीच बाहेर काढली आम्ही! आमच्या मंगळ्या गड्यानं कसलंसं औषधमंतर करून तिला बरी केल्यानंतर दोन वर्षांनी हा हिऱ्या झाला तिला!.. हो! याच गोठ्यांत! इथं!...त्यांतच मग मेली बिचारी! हल्लीं आमच्या सूनबाईचा तान्हा दूध पितो ना, ती तांबू गाय या हिऱ्याच्या मोठ्या बहिणीची दुसरी मुलगी..."

त्यांच्या चर्पटपंजरीला कंटाळून 'अन् हा सोन्या'... म्हणून उगाच एखादा प्रश्न टाकावा; कीं तसाच एखादा इतिहास बाहेर पडून तोहि एक 'घरगुती खोंड'च ठरे!

मग ते आपण होऊनच त्यांच्या त्या जोडीविषयीं वर्णन करूं लागत— "प्रथम गाडीला काढतांना फारच त्रास दिला होऽ शिंच्यांनीं! मस्त लेकाचे! धांवतां धांवतां गाडी कुठं तरी रस्त्याच्या कडेला नेत! पण मग थोड्या सवयीनं गुलाम असे छानदार चालीत धावूं लागले...म्हणतां,ऽकीं तो सात-पटीचा करीमसाहेऽब...हं, तोच,..लागला कीं माझ्यामागं;...म्हणाला, वाटेल ती रक्कम घे; पण,..."

—५—

असं ते लांबूं लागले कीं त्यांना पुन्हां आठवण करून द्यावी लागे!

अप्पांचं हिऱ्यासोन्यांवरचं प्रेमच तसं अतोनात! त्यांच्याविषयींची एखादी लहानसहानशी आठवणही त्यांना लाख मोलाची वाटे!

अप्पांच्या चिरंजिवांनीं 'आपण एक घोड्याचा टांगा ठेवूं' म्हणून सहजच मागं गोष्ट काढली;..तेव्हां ते किती मोठ्यानें त्यांच्यावर खेंकसले! आणि जेव्हा त्यांच्या एका सावकार मित्रानें स्वतः मोटार घेतली, त्या वेळीं अप्पांनाहि त्यानें तशी घ्यायचा आग्रह केला; पण अप्पा आपल्या हिऱ्या-सोन्यांच्यां पाठीवर हात फिरवित थोपटीत म्हणाले–" अहो;...या सजीव जोडीची गाडी सोडून मला तुमच्यासारखी निर्जीव मोटार काय करायची? तुमची तुम्हालाच ती लखलाभ असो!"

अप्पांनीं रोज आंघोळीपूर्वी स्वतः हिऱ्या–सोन्यांना धुवावं, दाणावैरण चारावी अन् पाणी दाखवावं. गवताच्या पेंढ्या तेवढ्या गडी सोडी; तरी स्वतः एकदां सारं पाहिल्याशिवाय चैन नसे त्यांना!

कुठंहि काम असलं, कीं हिऱ्या–सोन्याला जुंपून ते आपल्या सारवट गाडीतून बाहेर निघत! जोडी जोडायची आपण स्वतः;...शिवळजोतं देखील सैल-घट्ट काय ते आपणच बांधायचं त्यांचं!— कोणा गड्याची लटपट नाहीं कामाची तिथं! पागा हातांत घेऊन अप्पांनीं हांक मारली, कीं हिऱ्या-सोन्या चालूं लागत. शेंपट्या पिळायला नकोत, कीं पराणी मारायला नको!

एकदां खोंकून अप्पांनीं इषारा दिला कीं मग तर जोडी चौखूर धांवूं लागे!

–६–

पाऊसपाणी चांगलं व्हावं; दसऱ्याला भरघोस कणसं दारावरल्या तोरणांत लटकवावींत! कांपणमिळणी संपल्याचे निरोप आले, कीं चालले अप्पा हिऱ्यासोन्यांच्या सारवट गाडींतून, मोठ्या पहांटेस, खंडाच्या मापणीला, दहादहा मैलांवरच्या आपल्या शेतांवर! म्हाताऱ्याला त्याचा अजूनहि कंटाळा नव्हता.

पूर्वेकडे फटफटीत झालं आहे; कात्रीडी गाड्यांच्या चाकांचा खडखड आवाज ऐकूं येत आहे! रस्त्याला लागूनच, पण जरा आंत असलेल्या शेतांतील झोंपड्यांजवळ धनगरी कुत्रीं भुंकत आहेत; कोंबडे आरवत आहेत! दळणाला मांडलेल्या जात्यांचा घरघर आवाज ऐकूं येत आहे; पक्ष्यांचा किलबिलाट सुरू झाला आहे!

अशा वेळीं आप्पांची गाडी खडीच्या खडबडीत रस्त्यावरून खेड्याकडे जाणाऱ्या एखाद्या मऊ मातीच्या गराडींत उतरत असे! सूर्यबिंब नुकतंच वर येत असलं तर अप्पांनीं पांगासकट हात वर करून सूर्यनारायणाला ...

त्या मऊ मातींतून गाडीचीं चाकं शांतपणें घसरत असल्यामुळें, हिऱ्या—सोन्यांच्या गळ्यांतील घुंगुरांचा 'खुळ्खुळ्' मंजुळ ध्वनी तेवढाच काय तो एक सारखा ऐकूं येई!

गराडीजवळचीं बाभळीचीं झुडपं गाडीच्या तट्ट्याला ओरबडून मागं जात आहेत! गराडीच्या मधल्या उंचवट्यावर वाढलेल्या करवंदीच्या जाळ्या मधून मधून गाडीच्या धुरांडाखालून मागं निसटत आहेत! कमरेला बांडी–कोयता लटकावून काथ्याच्या दोराच्या साह्यानें ताडाच्या झाडावर चढणारे –उतरणारे भंडारी किंवा लांबवर गवती नंबरांतून गवताच्या मोठमोठ्या राशींच्या जवळपास कामास सुरवात करणारे काथोडी दिसत आहेत!...

अप्पा असं इकडेतिकडे पहात असतां, हिऱ्या–सोन्यांनीं आपल्या गळ्यांतल्या घुंगुरांच्या तालावर गराडीच्या चाकोरींतील तांबसर मातीतून ते बसलेली ती गाडी जोरांत पुढं ओढून न्यावी!

पण अप्पांनाहि त्यांची काळजी असे! अर्धी वाटचाल झाली, कीं, विसांव्यासाठीं एखादी छायेची जागा पाहून त्यांनी गाडी थोडा वेळ उभी करावी; हिऱ्या–सोन्यांना थोपटावं; त्यांच्या शिंगाजवळ खाजवावं; दोनचार खुरासणीच्या पेंडीचे तुकडे चारावेत; जोतीशिवळं सैल करून पुन्हां बांधावीं;..

कीं, नुसत्या हातांतल्या पांगाच्या इषाऱ्यावर दौड करावयास हिऱ्या-सोन्या पुन्हां अगदीं आनंदानें तयार !

—७—

मापाचं वगैरे काम झालं कीं संध्याकाळीं सूर्य थोडा खालीं कलल्यावर थंड वेळीं परत फिरावं; घरच्या ओढीनें हिऱ्या-सोन्या सारख्या चालीनें धावूं लागत ! गराड सोडून रस्त्याला लागेपर्यंत सांज होऊन बराच काळोखहि पसरलेला असे.

नुकत्याच घराकडे परतलेल्या गुरांच्या पावलांनीं उडालेला धुरळा सर्व बाजूस हवेंत पसरला आहे ! जवळपासच्या झोंपड्यांतून एखाददुसरा दिवा मिणमिणत आहे; दमल्याभागल्या पुरुषांचं स्नान चाललं आहे; पोरांच्या खेळाची आरडाओरड सुरूं आहे!...चुलींत घातलेल्या बोंबलांचा किंवा रस्त्याच्या कडेला असलेल्या एकप्रकारच्या झुडपांचा ('भुताटकीनें उकडलेल्या बटाट्या' सारखा) उग्र वास येत आहे !...

अशा समयीं चंद्रप्रकाशामुळें पडलेल्या वडांच्या सावलींतून हिऱ्या-सोन्यांच्या जोडीनें अप्पा बसलेली सारवट गाडी घरीं घेऊन यावी !

अशीं अठरा वर्षे गेलीं होतीं !

जिथं जिथं अप्पांनीं जावं तिथं तिथं हिऱ्या-सोन्यांची जोडी !!

—८—

हिऱ्या सोन्याकडे बघे !...सोन्या हिऱ्याकडे बघे !!...

आज दोन दिवस अप्पा त्यांना दिसले नव्हते; त्यांना त्यांनीं दाणावैरण चारली नव्हती; पाणी दाखवून अंजारलंगोंजारलं नव्हतं; कीं 'हिऱ्याऽ'... 'सोन्याऽ'...म्हणून नुसती हांकहि मारली नव्हती !

सुरुवातीस थंडीवाऱ्याचं निमित्त होऊन दोनतीन दिवसांत म्हातारा तापानें बिछान्याला खिळून पडला होता, हें बिचाऱ्यांना कसं समजावं ? कोण त्यांना सांगणार ?...

गडी येऊन त्यांच्यापुढें वैरण ठेवीत;...ते खात नसत ! पाणी दाखवीत ते पीत नसत ! गवताच्या पेंढ्या सोडीत;...त्याला ते शिवतहि नसत !

त्यांना वाटे कीं, 'आत्तां आपला मालक येईल; आपल्याला प्रेमानें हांका मारील; आपल्या थरथरत्या हातानें आपल्याला थोपटील; पेंडीचे तुकडे तोंडांत घालून कांहीं तरी बोलत आपल्या मानेला विळखा घालील !'...

पण त्या सर्व हिऱ्या–सोन्यांच्या कल्पनाच होत्या !

अप्पा तर तिकडं तापानें बिछान्यावर तळमळत होते !...अळशीच्या पोटिसाच्या सारख्या शेकानेंहि त्यांचा कफ सैल होत नव्हता !

वैद्यबुवा म्हणूं लागले होते, "म्हातारं माणूस ! केव्हां तरी जायचंच !!"

तरी पण अप्पांना हिऱ्या-सोन्यांची आठवण झाल्यावांचून राहात नसे !— " 'डोबे' झाले म्हणून त्यांना विकून टाकाल रे !"–ते मधून मधून ओरडत व त्यांच्या डोळ्यांतून अश्रू टपकूं लागत !

–९–

त्या चार दिवसांत हिऱ्या–सोन्यांनीं गवताची काडीहि खाल्ली नव्हती !— समोर आलेलं पाणी नुसतं हुंगून पाहात ! पुढल्या अंगणांतील अप्पांच्या नेहमींच्या बसावयाच्या खुर्चीकडे किंवा दाराच्या उंबरठ्याकडे–' ते आत्तां येतील, मग येतील' अशा–दीन उत्कंठेनें पाहून निराशा झाली किंवा घरांतून त्यांच्या कण्हण्याचा क्षीण, पण ओळखीचा आवाज ऐकूं आला, कीं हिऱ्या–सोन्या दोघेहि मोठमोठ्यानें हंबरत !...त्यांना जणूं ते हांका मारत " हाऽऽ प्पाऽ ! हाऽऽऽप्पाऽऽ "...

...आणि तें हंबरणं अप्पांच्या कानीं गेलं कीं तेहि बिछान्यावर पडल्या पडल्या मोठ्यानें ओरडत, " अरे, त्यांचं दाणा-वैरण झालं का ?...पाणी दाखवायचं राहिलं असेल..."

नाहींतर त्यांनीं एकदम चिडखोरपणें खेंकसून म्हणावं, " अरे, मी नसलों तर तुम्ही त्यांना उपाशीं मारूऽन टाकाल, मारूऽन ! "

पण त्या चालत्या धडधाकट बैलजोडीला मारण्याचा कोणाचाच कधीं विचार झाला नाहीं व नसता !—त्या दोघांपुढें सारं कांहीं येत होतं !—

पण हिऱ्या-सोन्यांपुढें अप्पा येत नव्हते ! त्यांचा प्रेमळ हात त्यांच्या पाठीवरून फिरत नव्हता ! त्यांच्या हातचे पेंडीचे तुकडे चघळण्याचं सुख किंवा ते बसलेली स्वारीची गाडी ओढून नेल्याचा आनंद अनुभविण्याची संधीही त्यांना येत नव्हती !...त्यांना अप्पाच मुळीं पारखे झाले होते साफ.

—१०—

पण मग, शेवटीं एके दिवशीं सकाळीं, लोकांनीं त्यांच्या अप्पांना उचलून अंगणांत आणलेलं हिऱ्या-सोन्यांना दिसलं !—

त्यांच्या जिवाची कोण धडपड !...मोठ्यामोठ्यानें हंबरून त्यांनीं आपलीं दावीं तोडण्याचा प्रयत्न केला !—

हिऱ्या मोकळा होऊन अंगणाकडे येऊं लागला तोंच त्याला गड्यानें पुन्हां भक्कम बांधलं !—

ते दोघेही मोठमोठ्यानें हंबरतच होते !

पण अप्पा त्यांच्याशीं कांहीं बोलले नाहींत कीं त्यांच्याजवळ देखील आले नाहींत !—

हिऱ्या-सोन्यांच्या देखतच, लोकांनी अप्पांना उचलून फाटकाबाहेर लांब, अगदीं लांब नेलं ! तें पाहून आश्चर्यमिश्रित दुःखानें ते सतत मोठ्यानें हंबरूं लागले; जणूं ओरडून म्हणूं लागले " अप्पाऽ, थाऽ होऽ या ! तुम्ही भेटलां

नाहींत म्हणून आम्ही अगदीं उपाशीं आहों ! पाठीवरून नुसता हात फिरवून आम्हाला नेहमीं प्रमाणें एकदां थोपटा तरी ! ”

त्यानें अप्पा कांहीं आले नाहीतच ! पण दोनदोन रपाटे मात्र बसले पाठींत काठीचे !— ‘वाघ खाय येन् !...बुगाच वरडाया रोग आलाय् का ? आंऽ?’...गोवारी ओरडला;...त्याच्याकडे दीनपणें टक लावून पहात आणखी माराच्या भीतीनें हिऱ्या-सोन्या स्तब्ध राहिले !

मुक्या हृदयाच्या भावना हृदयांतल्या हृदयांत धुमसूं लागल्या !—

आधीं वाचा नव्हतीच; पण आतां भाव प्रकट करणंहि अशक्य झालं !—

‘ पशुहृदयालाहि प्रेमाचा ओलावा व भावभावना असतात ’ हें मानवी हृदयाला समजलंच नाहीं !—

## –११–

दुसऱ्या दिवशीं सकाळीं हिऱ्या-सोन्यांची जोडी एकमेकांच्या मानेजवळ मान टाकून मरून पडली होती !

‘ हा असा चमत्कार घडला तरी कसा ?’ हें शजाऱ्यापाजाऱ्यांना एक भयंकर कोडंच पडलं !

शोक आवरून अप्पांचे चिरंजीव बाहेर येऊन पाहतात,...तों त्यांनाहि धक्का बसला; आश्चर्य वाटलं !–

पण त्यांत ‘ गाडीला चांगली चालणारी सुदृढ जोडी एकदम अनपेक्षित मेली ’ याबद्दलचं दुःखच जास्त डोकावत असेल कां ?

आणि शेवटीं सर्वानुमतें ठरलं...कीं, कोणतं तरी विषारी किरडूं रात्रीं चावलं; नि हिऱ्या-सोन्या त्याच्या विषानेंच मेले !

हिऱ्या-सोन्यांचा अंत विषामुळें झाला होता कीं अमृतामुळें,...हें मात्र खुद्द त्यांचं त्यांनाच ठाऊक !...पशु-हृदय मानवाला कसं कळणार ?

माणसांतल्या पशूला पशूंतल्या माणुसकीची कशी बरं कल्पना येणार?—

—१२—

महारांनीं त्यांना उलटं करून कातडं काढण्यासाठीं, वांशावर घालून नेईं-पर्यंत, शेजारच्या बंडूनानांचा अरुण त्यांच्याकडे कुतूहलदृष्टीनें पाहत होता!

बंडूनानांनीं हांक मारली तरी तो हिऱ्या–सोन्यांच्या अश्रूंनीं डबडबलेल्या डोळयांकडेच पाहत राहिला! जरा आणखी खालीं वांकून त्यानें पाहिलं असतं तर त्यांत त्याला स्वतःचंच प्रतिबिंब दिसलं असतं!

महार उचलूं लागतांच अरुणचे बालिश कोमल डोळे आंसवांनीं डबडबून भरूं लागले!...

तोंच बंडूनाना त्याच्यावर पाठींमागून ओरडले, "अरेऽ...मी काय म्हणतोय् मघांपासून!...तुला ऐकूं येतंय् कीं नाहीं? एऽ बैलोबाऽ?!"




[ ६ ]

## —हंबीरचा धनी

—१—

तो असा आजारी पडून किती तरी दिवस झाले होते; अलीकडे तर तो येतां जातां लत्ता खाणारा निरुपयोगी जिवंत मुडदाच गणला जात असे !—

त्याच्या अंगाचं कातडं कमावून फारच सुंदर होईल याची त्यांना जाणीव होती. पण ते ' चांगले ' लोक म्हणाले, " त्याला ठार मारणं जरा चूक ...निर्दयपणाचं होईल ! "

होय; आणि असं त्या चांगल्या लोकांना वाटलं म्हणूनच फक्त...हळूहळू मरण्यासाठीं, हंबीर एकाकी पडून होता ! बाकी बाबतींत त्याचं सर्वांना केव्हांच पुरं विस्मरण झालं होतं ! !

—२—

पण कधीं कधीं, तो फारच हळू हळू मरत आहे, हें त्याला समजाविण्या-साठीं, ते पुण्यात्मे त्याला लाथांचा खुराक चारीत ! एरवीं अलीकडे त्यांचा त्याचा फारसा संबंध येत नसेच ! !

ज्या कुत्र्यांबरोबर तो शिकारीचा पाठलाग करी, ते शिकारी कुत्रे अलीकडे एकदां त्याला भेटायला त्याच्या तबेल्यांत आले !...पण...कुत्र्यांचीं मनं म्हणतात नीचच...( बाकी साहजिकच आहे म्हणा !...मनुष्य प्राण्याच्या अतिसंगतीनें याशिवाय दुसरं काय होणार ? ? )...धन्याच्या हांका ऐकतांच ते तत्काल त्याला सोडून निघून गेले !...

त्यांच्यांतला म्हातारा मोत्या तेवढाच काय तो त्याच्याकडे बराच वेळ बसून असे ! डोळे किलकिले ठेवून, हंबीरच्या खाण्यापिण्याच्या घमेल्याजवळ पडल्या पडल्या...त्याचे अश्रुपूर्ण, दुःखी व सूचक असे मोठे डोळे पाहून मोत्याला दुःख होई; व भीतीही वाटे !

असे एकंदरींत त्या म्हाताऱ्या एकाकी घोड्याचे अखेरचे भोग होते !...

—३—

दिवस त्याची सोबत करीत ! बहुतेक सोनेरी, गुलाबी अशा तऱ्हेचेच ते असत:...पण कधीं कधीं दुःखी कष्टी दिवस, त्याचा तो तबेला रडयानें भरून टाकीत !...हंबीरची ती स्थिति पाहूनच...जणूं काय, त्यांचं पाऊल पुढं पडत नसे;...इतक्या हळू हळू दिवस निघून जात ते !

तथापि हंबीरला मात्र लहानशा पण स्तब्ध व भयाण अशा रात्रींचीच जास्त भीति वाटे;...तो नक्की मरणार असं त्याला खरंखरं समजून येई तें त्याच वेळीं !...

आणि तो मग भीतीमुळें बेफामपणें धडपड करूं लागे !—

कुठं भिंतीवर लाथा आपट, कुठं बांधून ठेवलेली दोरी तोडण्याचा प्रयत्न कर,...त्याला आपली सुटका करून घ्यावी अशी उत्कट इच्छा होई !...पळून ...कुठं तरी लांब पळून जावंसं त्याच्या जीवाला वाटे...तें असल्या भयाण रात्रींच !...

मावळत्या सूर्याचे लांब किरण, फळकटांच्या भिंतीच्या फटींतून तबेल्यांत येतांना त्यानें पाहिले, कीं, दुःख असह्य होऊन आर्त स्वरानें तो खेंकाळू लागला.

—४—

त्या बुडत्या दिवसाच्या स्तब्धतेंत त्याची बिचाऱ्याची कोण दाद घेतो ! साऱ्या जगांत तो जणूं एकटाच होता !...

चिमण्या भुर्कन् उडून जात; आपल्या घरट्यातून चिवचिवत;...लांबून ...अगदीं लांबून...कापणी चाललेल्या शेतांतून विळ्यांचा 'खस् खस्' असा सूक्ष्म आवाज अजून ऐकूं येत होता! कापतां कापतां बाहेर पडणारी एखाद्या ग्राम्यगानाची लकेर;...आपापसांतील कुजबुजणं;...सर्व...कांहीं इतक्या दुरूनही स्पष्ट ऐकूं येत होतं!

पण हंबीरसभोवतीं मात्र भयाण...अगदीं भयाण..शांतता पसरली होती!!

त्यामुळेंच, त्याच्या अंगावर भीतीनें कांटा उभा राहिला...त्या दुःखी जीवानें हताशपणें धडपड केली!

धडपड...खूप धडपड करून त्याची दावणी तुटली;...तो मोकळा झाला...आणि आवारांत पळूं लागला,...

बुडत्या सूर्याला पाहून त्याच्या डोळ्यांपुढं अंधेरी आली! त्याच्या पोटांत भयंकर दुःख होत होतं. आपलं डोकं खालीं करून तो सुन्न होऊन लटपटत उभा राहिला!

—५—

पण थोड्याच वेळांत तो पुन्हां भानावर आला; शेतं, अरण्यं, कुरणं सर्वांच्या जुनाट अंधुक अंधुक आठवणी त्याच्या डोक्यांत भ्रमूं लागल्या!...'सारखं धांवत सुटावं! सारखं धांवत सुटावं!!' असं त्याला वाटूं लागलं! पुन्हा दूरवर धांवत जाण्याची इच्छा! 'जगावं!' अजून जगण्याची अतृप्त तीव्र तृष्णा...

त्या आवारांतून बाहेर पडण्यासाठीं तो रस्ता शोधूं लागला...पण त्याची खटपट व्यर्थ होती...बिचाऱ्याला सरळ उभंही राहवत नव्हतं; त्याला भयंकरच दुःख होत होतं;...त्याच्या दुखीच्या सडलेल्या भागांतून रक्ताचा प्रवाह चालूच होता...

शेवटीं त्याला एक कुंपण दिसलं. तेथून त्याला आपल्या धन्याचं तें चिर-परिचित घर दिसत होतं! त्या समोरील फुलांनीं आच्छादिलेलं तें गवती

हिरवंगार कुरण; ..त्याच हिरव्यागार गवतांत ऊन खात पडलेले त्याचे एकेकाळचे सवंगडी, ते शिकारी कुत्रे...सोनेरी किरणांनीं चकाकणारीं खिडकीचीं तावदानं;...सर्व कांहीं त्याला दिसत होतं...

तो एकदां दुःखपूर्णपणें खेंकाळला...जणुं काय तो म्हणाला, "याऽहोऽ! कोणी तरी माझ्याकडे याऽहोऽ!! मी अगदीं एकटा अगदीं .."

—६—

कोणी त्याच्याकडे आलं असतं,...एखादा प्रेमळ शद्ब बोललं असतं,... 'बेटाऽहा मी आहे हं इथं' असं म्हणून त्याची पाठ थोपटली असती,... तर तो आनंदानें—आनंदी मनानें...मेला असता!...

पण छेः! सभोंवार शांत होतं...स्तब्ध...पूर्ण स्तब्ध...दिशासुद्धां धुंद दिसत होत्या!!...

फाटकाशीं टक्कर खेळ, कुठं कुंपणाच्या तारांनाच चावे घे...बिचाऱ्याची सुटून दूर दूर त्या घराजवळ जाण्याची अजून धडपड चालली होती!...

शेवटीं फाटक मोडून...तो बागेंत आला;...दुःखामुळें त्याचं आर्तस्वराचं ओरडणं चाललंच होतं;...पण तें कोणाला ऐकूं गेलं नाहीं!..

तो पडदा लावलेल्या खिडकीकडे गेला;...दोन पायऱ्या चढून तिथं खेंकाळला!...शेवटीं सर्व घराभोंवतीं त्यानें प्रदक्षिणा घातली; पण त्याला कोणी, अगदीं कोणी दिसलं नाहीं!!...

इतक्यांत, त्याला एकदम कांहीं दिसेनासंच झालं!...एखाद्या समुद्रा-सारखी दूरवर...अगदीं दूरवर...क्षितीजापर्यंत...पसरलेलीं कुरणंच फक्त त्याला समोर दिसत होतीं!...आधींच शक्ति नाहीं, त्यांत असली दृश्यं सभोंवार घोंटाळूं लागलीं!...

—७—

हंबीरचं अंग थरथरलं!...त्याचे डोळे दुःखानें भरून आले!...

१७।१५२

श्वासोच्छ्वास जड सुरू झाला !...गरम झालेल्या नागपुड्या त्यानें हिरव्यागार ओलसर कुरणांत खुपसल्या !...

तहान...खूप तहान लागली होती;... पण तो तसाच पाय ओढीत पुढं चालत होता;...त्याला सुटून जावं असं सारखं वाटत होतं!...तो तसाच धडपडत चालला...शेवटीं, त्याचे पायहि जवळ जवळ हालेचनात;...इतके ते जड निर्जीव झाले.

कापलेल्या पिकांच्या देठांवरही तो आपटूं लागला;...लहान सहान खांच-खळगे सुद्धां त्याला मोठ्या खड्ड्यासारखे वाटूं लागले;...कोवळ्या कुरणांतही त्याचे पाय गुंतूं लागले;...छोटीमोठीं झुडपंही त्याचा रस्ता आडवीत होतीं !..

सर्व पृथ्वीच...जणूं काय,...त्याला आपल्याकडे ओढूं पहात होती;... त्याला कांहींच दिसेनासं झालं होतं;...डोळ्यांसमोर सगळीकडे घनदाट अंधार पसरला होता !!...

क्षणोक्षणी, त्याचा मुका जीव...आंत...आंत-भीतीच्या भयाण काळोखांत —शिरत होता !

धुक्यांतून चालल्याप्रमाणें त्याला कांहीं दिसत नव्हतं; तरीहि तो पुढं जाण्याची धडपड करीतच होता...

## —८—

एक पक्षी जातां जातां त्याच्या दोन पायांमधून उडून गेला;...त्याच्या स्पर्शामुळें त्याचं अंग भीतीनें थरारलं. तो तिथल्या तिथंच स्तब्ध उभा राहिला !...त्याला पुढं जाण्याचं धैर्यच होईना !...

उडतां उडतां कावळ्यांनीं त्याला पाहिलं; ते जवळच्या झाडावर येऊन बसले !...त्यांचा कर्कश, अपशकुनी ओरडा चालू झाला; हंबीर दचकला !..

त्याची शक्ति आतां संपत आली;...तो जमिनीवर अगदीं गलितगात्र होऊन धाडकन् पडला !...

शेवटीं, त्यानें हात पाय ताठरले;...शून्य आकाशाकडे दृष्टि लावली;...नि करुण स्वरानें तो मोठमोठ्यानें खेंकाळूं लागला !...

लागलींच कावळे झाडावरून खालीं उतरले;...उड्या मारीत मारीत, ते हळूहळू त्याच्या अगदीं जवळ आले...

कुरणांतील रोप वांकून वांकून त्याच्याकडे आपल्या फुलांच्या डोळ्यांनीं निरखून पाहूं लागले...

—९—

कावळे आणखीच जवळ आले;...आपापल्या चोंची गवताच्या सुकलेल्या देठांवर ते शस्त्राप्रमाणें पाजळूं लागले;...कांहीं तर मोठ्यानें 'काव काव' करीत त्याच्या भोंवतीं घिरट्याहि घालूं लागले !...

हंबीरला त्यांच्या अर्ध्या उघड्या चोंची व वाटोळे क्षणकाळ डोळे दिसले;... पण त्याला हालणं शक्यच नव्हतं आतां...त्यानें आपले खूर जमिनीवर जोरजोरानें आपटले...

त्याला वाटलं, 'आपण पुन्हां उठून...इकडे तिकडे दौडच करीत आहोंत...शिकारीचा पाठलाग करीत आहोंत;...जवळच कुत्रे भोंकत भोंकत दौड करीत आहेत...'

पण त्याला तें सगळं 'वाटत'च होतं...नि याचीही त्याला आंतल्या आंत जाणीव होत होती !...

त्याला तें दुःख असह्य झालं...नि त्यानें पुन्हां विव्हल होऊन आर्तस्वरानें एक मोठी किंकाळी फोडली !—

—१०—

कावळे तितकाच वेळ कायते दूर पळाले...पण पुन्हां...सभोंवर 'काव्...काव्'...

आतां मात्र त्याला कांहींच दिसत नव्हतं...समजत नव्हतं;...सभोंवार सर्व फिरत होतं;...आपण कुठं तरी आंत आंत रुतत जात आहों, असं त्याला वाटलं...तोंच एक अगदीं गार लाट त्याच्या शरिरांतून गेली;..आणि...आणि-त्याचं शरीर–अखेर पूर्ण स्तब्ध पडलं!..पुन्हां थोडंसुद्धां हाललं नाहीं...

सूर्यहि साफ बुडाला...संधिप्रकाश जिकडे तिकडे पसरूं लागला;...कुत्र्यांचं भुंकणं लांबूनही ऐकूं येत होतं...

## –११–

मोत्या तेवढा अडखळत...पण धांवतच...आपल्या मित्राकडे गेला;...पण आतां हंबीरनें त्याला मुळींच ओळखलं नाहीं !...त्या म्हाताऱ्या कुत्र्यानें त्याला चाटून पाहिलं;...पण छेः...जरासुद्धां हालचाल नाहीं...कीं शद्व नाहीं...

मोत्या भुंकत इकडे तिकडे वेड्यासारखा फिरूं लागला;...'धांवा होऽ धांवा ! मदतीला या ! हंबीर...आमचा हंबीर मेला !...' जणूं काय तो मोठमोठ्यानें ओरडत होता...

पण...पण...कोणीही आलं नाहीं...

## –१२–


हंबीराच्या पेंचलेल्या डोळ्यांत गवत मात्र पुन्हां पुन्हां वांकून पहात होतं !..

पक्षांचा गराडा जास्तच वाढूं लागला;...हजारों जीवजंतु—त्याच्या शरिरावर त्याला पोखरण्यासाठीं, त्याला फाडण्यासाठीं, त्याच्या मांसावर मस्त मेजवानी करण्यासाठीं...अहमहमिकेनें उड्या घालूं लागले !...

गिधाडं-कावळ्यांचा कलकलाट जास्तच जोरानें सुरूं झाला...

मोत्या मात्र मोठ्यामोठ्यानें हेल काढून रडत होता...

आणि...आणि...तीं 'चांगली' माणसं ? !......



[७]

# कीटक सृष्टि — मुंग्यांच्या जगांत

—१—

तोंडानें शीळ घालीत सायकलवरून उगाचच फेऱ्या घालीत होतों !

आकाशाकडे पाहा,...झाडांकडे पहा...पश्चिमेला अस्त

सूर्याकडे पहा,...असे माझे निरर्थक चाळे चालले होते !

इतक्यांत माझं माझ्या पायाकडे लक्ष गेलं ! आणि..

पायाखालीं नेहमींच उशिरां लक्ष जातं !...

मुंग्यांची एक काळी रंग लांबवरपर्यंत वांकडीतिकडीं वा

पण ती पाहून थांबण्यापूर्वीच, माझ्या सायकलीचीं

लहानसा भाग चिरडून त्या रांगेवरून पुढें निघून गेलीं !

चटकन् ब्रेक दाबून सायकल थांबवली;...खालीं उ

पाडून ठेवली; नि जरा लक्षपूर्वक निरखून पाहण्यास

काळ्या रांगेजवळ जाऊन उकिडवा बसलों !

स्वतःच्या उंचीवरून थोडं खालीं आल्यावर व मान

वर कोणालाहि सर्व स्पष्ट दिसूं लागतं !

—२—

तिथं वीस-पंचवीस मुंग्या जमीनदोस्त झाल्या होत्या !

तीच त्या दिवसाची माझी फुशारकी !...मला वाईट वाटलं !...पण

हुळहुळणाऱ्या हृदयाला मी लागलीच थोड्या कठोरतेनें दाबलं—" इतकी भावनाप्रधानता काय उपयोगी जगामधें ?...काय मीच एक मनुष्य ?"

माझी दृष्टि त्या मुंग्यांच्या काळ्या तांबड्या रांगेवरच स्थिर झाली होती !

...आवाज नव्हता ! गिल्ला–गोंगाट नव्हता ! ! रांगा सतत जात अन् येत; जणूं कुठं आघात-अपघात झालाच नव्हता !...

मला रागच आला; जरा कांहीं नवीन झालं,...कीं, आरडाओरड् एकण्याची आम्हाला सवय ! मुंग्यांना आम्ही मोठ्या उद्योगी म्हणतों !... म्हणून इतका निष्ठुरपणा काय उपयोगी ?...मेलेल्या जातभाईंची व्यवस्था लावण्यापुरतीसुद्धां त्यांना फुरसत नाहीं ? ?...

—२—

पण माझ्या मानवी मनाचा संशय खोटा ठरला !...

चिरडलेल्या जागीं जाणाऱ्या येणाऱ्या रांगेतील मुंग्यांचें आपापसांत बोलणें सुरू झालं होतं ! एक एक सेकंद, एक दुसरीशीं बोले, नि मग झटकन् आपल्या मार्गाला लागे !

थोडा वेळ तसा विचारविनिमय झाल्यावर—जाणाऱ्या येणाऱ्या रांगा तशाच कायम ठेऊन-कांहीं मुंग्यांचा घोळका अपघाताच्या ठिकाणीं...जखमी व ठार झालेल्या बांधवांभोंवतीं गोळा झाला. सर्व व्यवहार कसे अगदीं जलद चालले होते.

मग जमिनीवर चिरडून गतप्राण झालेल्या वीरांचीं शवें अलगद वर उचलण्यांत आलीं ! तिघातिघांचा एक कंपू होऊन प्रत्येकानें बळी पडलेला एक एक वीर आपल्या ताब्यांत घेतला; चालायलाहि त्वरित सुरुवात केली !

थोड्याच वेळांत ती सर्व तुकडी जाणाऱ्या येणाऱ्या रांगेपैकीं एकींत मिसळून, आपल्या ताब्यांतील हुतात्म्यांच्या शवांसह, रांगेतून शांतपणें जाऊं लागली होती !

## —४—

माझ्यादेखत तसले कितीतरी अपघात माणसांकरवीं त्या शांतताप्रिय प्राण्यांतहि होत होते! पण त्यांची रांग मात्र जशीच्या तशीच कायम!...

चिकाटी...सहनशीलता!...सन्मार्ग...सत्याग्रह!!

प्रत्येक ठिकाणीं त्या हें शांतताव्रत असंच कायम ठेवीत असतील काय?

मी थोडं जास्त बारकाईनें पाहूं लागलों! जिवंत मुग्यांची ये-जा,... पुन: ठरल्या रस्त्यानें,...पूर्वी इतक्याच शिस्तीनें व शांततेनें भरभर होऊं लागली! त्यांत किंचित् देखील खंड पडला नाहीं!

भिंतीच्या बाजूनें येणाऱ्या रांगेतील प्रत्येक मुंगीच्या तोंडांत रव्याचा किंवा साखरेचा बारीक पांढरा कण होता; रिकाम्या मुंग्या भिंतीकडे जात होत्या!

भिंतीपासून लांब जाणाऱ्या रांगेत, मेलेल्या मुंग्या घेऊन गेलेली मघांची तुकडी मी शोधूं लागलों; पांच सहा पावलं पाहत पाहत चालल्यावर मला ती तात्काळ दिसली! मी त्यांच्याबरोबर पुढील रस्ता काढूं लागलों!

## —५—

पांच मिनिटं माझा त्यांच्याबरोबर प्रवास चालला होता! त्या चिमुकल्या जीवांची धडपड किती उत्साहपूर्ण होती म्हणून सांगूं?

शेवटीं, त्या माळरानांतील एका उंचवट्याजवळ, आम्ही सर्व येऊन दाखल झालों.

त्या लहानशा पोकळ टेंकाडाला वळसा घालून, ती मुग्यांची काळी रांग शेवटीं मला आपल्या जगाच्या प्रवेशद्वाराशीं घेऊन आली!...

त्या लहानशा भोंकांतून त्या सगळ्या आंत जात होत्या...बाहेर येत होत्या!

मी तेथपर्यंत, त्या मुंग्यांच्या स्वयंसेवकदलांत मिसळूनच येऊन पोहोंचलों होतों! त्यांचा-माझा बराच वेळ संबंध आला होता!...

त्यामुळेंच त्यांच्या चिमुकल्या राष्ट्राकडे मी आपुलकीच्या भावानें पाहूं लागलों ! . वाटलं...त्यांची सारी धडपड सत्य तत्त्वांना धरून नि म्हणूनच उघड उघड चालली होती ! स्वराष्ट्रपोषण, स्वराष्ट्रोन्नति, प्रत्येक व्यक्तीचं सुख; हो,...समाधान, शांति आणि आत्मोन्नति हींच त्यांचीं उदात्त तत्त्वं !...

कोण म्हणेल, तीं वाखाणण्यासारखीं नव्हतीं, असं ?...

—६—

पण ती एकजूटीनें चाललेली त्यांची स्वोन्नतीची अव्याहत धडपड,...सर्व जगावर स्वतःचे साम्राज्य स्थापण्याची स्वार्थी महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या साम्राज्यशाहीप्रिय मानवाला कशी सहन होणार ?...

त्याला वाटतं...आपण ती सहज पायाखालीं चिरडूं ! आणि तो तसा प्रयत्नहि करतो !—

पण स्वतःच्या श्रेष्ठत्वाच्या घमेंडींत त्याच्याकडून कांहीं वेळ ठिकठिकाणचे थोडेसे भाग चिरडले गेले म्हणून काय झालं ? त्यांच्यांतील प्रत्येकाच्या हृदयांत स्वातंत्र्याची तीच तीव्र जागती ज्योत सारखी तेवत असली, तर मधले साम्राज्यशाहीच्या हावेनें व अरेरावीनें चिरडलेले भाग हां हां म्हणतां भरून निघतील !...ती जुटीची रांग तशीच अव्याहत चालूं राहील !

—७—

खरंच ! तो देखावाच अगदीं अवर्णनीय होता !

घमेंडखोर मानवानें देखत्या डोळां स्वतः पददलित केलेल्या—अथवा मज-प्रमाणें यंत्राच्या साह्यानें अमानुषपणें जखमी किंवा ठार केलेल्या—त्यांच्या राष्ट्रवीरांना परत घेऊन येणारी एक 'रेड क्रॉस' ची तुकडी, तितक्यांतच माझ्या अगदीं समोरून मोठ्या अभिमानानें व शिस्तीनें त्या भोंकांतून आंत अगदीं आंत शिरून गेली !

पण त्याच वेळीं तितक्याच उत्साहानें, तितक्याच धैर्यानें, स्वकर्तव्यासाठीं मुंग्यांचे नवीन नवीन स्वयंसेवक वीर, टोळ्याटोळ्यांनीं नि शांततेनें बाहेर पडत होते; त्या चिमुकल्या काळ्या तांबड्या रांगेला मिळून तिला अखंड पुढं चालवीत होते !

त्यांना स्वराष्ट्राच्या स्वातंत्र्याची खरी कल्पना होती !...

आणि त्यांना नुसतं जगण्यापेक्षां तें स्वातंत्र्य टिकवायचं होतं !...

होय ! स्वातंत्र्याची लज्जत एकदांही चाखलेल्या व्यक्तीचं असंच असतं !...

आणि हृदयाच्या हांकेला पुढाऱ्यांची किंवा नेत्यांची गरज काय ?...

—८—

अहाहा ! अशा या जगांतील त्या स्वतंत्र राष्ट्रांतील अंतर्व्यवस्था कशी असेल ?

माझे अंतश्चक्षू आंत शिरले खरे; पण बहिश्चक्षूंनाहि तें सर्व पाहण्याची झालेली प्रबळ इच्छा मोडवेना !...मी जवळची एक काटकी उचलून त्या मुंग्यांच्या जगाचा वरचा भाग फोडून आंत काय आहे तें पाहण्यासाठीं हात पुढं केला ! तोंच—

माझं हृदय मोठमोठ्यानें धडधड हलूं लागलं !...त्यांतून खोल पण रागाचा स्पष्ट आवाज ऐकूं आला...

" नीचाऽ ! थांब. एकदम थांब !...पारतंत्र्याच्या पंकांत मानेपर्यंत रुतलेला व त्यांतून बाहेर पडण्यासाठीं स्वतः किंचित् देखील हालचाल न करणारा तूं !...मुंग्यांच्या या स्वतंत्र राष्ट्राचं स्वास्थ्य बिघडविण्याचा तुला रे काय अधिकार ? "

...आणि खरंच ! दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षा जुलुमजबरदस्तीनें दडपून टाकण्याचा जगांत कोणाला अधिकार आहे ?...कोणाला आहे ??...

माझा हात नकळत एकदम मागं झाला ! तोंड अगदीं लाजेनें काळं झालं !

( ...पण त्याबरोबरच नवीन आशेनें हृदय फुलूनहि आलं ! ! )




[८]

—भराऱ्या

## —१—

कधीं कधीं मनाची मोठी गंमतीची स्थिती असते !

त्या दिवशीं मी निद्रावश होण्यापूर्वी माझ्या मनांत सारखा एकच विचार चालू होता;...' मी पक्षी असतों तर '...

उंच उंच भराऱ्या मारल्या असत्या;...विशाल दृष्टीनें उंच-खोल सर्व पाहिलं असतं,...लांब लांब फिरलों असतों;...आतां इथं आहें न् आतां नाहीं; ...म्हणजे जणूं काय वारा ! किंवा सर्व ठिकाणींच आहे,...म्हणजे जणूं काय समुद्राचं पाणी !...

माझ्या मळ्याला मुळीं कुंपणच नको पडायला !...

अमर्याद पोकळी आणि आपण...फिरतोय् सारखा...

## —२—

...आणि मौज ही, कीं, मी थोड्याच वेळांत आकाशांत उडूंहि लागलों; वर वर जाऊं लागलों...तसतसं सध्यांचं जग मला अगदीं लहान लहान वाटूं लागलं...

मी पंख हलवी आणि गार वारा माझ्या अंगाला भिरीभिरी स्पर्शून जाई !...त्या नवचैतन्यपूर्ण झुळुका मोठ्या आल्हाददायी होत्या !...

जगांतून पहाणाऱ्यांना मी एक नाहक भराऱ्या मारणारा लहानसा प्राणी दिसलों असेन; तथापि माझ्या उंचीवरून मला उलट तेच अति सूक्ष्म अति क्षुद्र वाटत होते !

ज्या बाजूस व जें जें पाहीन त्या सर्वांचा मी राजा होतों; आणि मी सर्व बाजूंसच पहात होतों !...माझ्या अंगाला लागून जाणारे ढग किती लांबवर पसरले होते ?...मला वाटलं, आपल्यालाही असंच लांबवर पसरतां आलं असतं तर ? ?...

## –३–

सहज खालीं दृष्टि फिरविली...

नानाकृति लहान मोठे डोंगर असंख्य वळणं घेऊन दूरवरपर्यंत पसरले होते ! त्यांच्या माथ्यावरील मोठमोठे वृक्ष वाऱ्याबरोबर माना डोलावीत होते ! झुडपं सळसळत होतीं; भूमीला धरून वाढणाऱ्या हिरवळीनें गालिचा पसरला होता; मधून मधून जाणारी वाऱ्याची झुळुक त्याला थरथरवीत होती. नानाठिकाणी अनेकविध व रंगीबेरंगी फुलांचे झाडांवरले गुच्छ माझं स्वागत करीत असल्यासारखे दिसत होते; त्या भोवतालच्या प्रदेशांतच, नागमोडी वळणं घेणारे पाण्यांचे हलणारे रजत-प्रवाह होते ! डबकीं व तलाव, लहान मोठ्या आरशांप्रमाणें मजकडे निरखून पहात होतीं !...

मी दुसऱ्या बाजूस दृष्टि फेंकली. रत्नाकर आपल्या बालिकांना–वारिवीचींना आपल्या अंकावर खेळवीत होता; दमल्यामुळें त्यांच्या तोंडून फेंस..नव्हे, लाळ गळत होती. दूरदूरपर्यंत पसरलेल्या त्या जलधीवर माझी दृष्टि स्थिरच होईना !-

तेथून नजर मागं खेंचून, मी वर चोहोंबाजूस पाहाण्याचा प्रयत्न केला !... पण सर्व बाजूस, अनंत निळी पोकळी पसरली होती;..कुठंही वरवर जावं !... अटकाव नाहीं.

## –४–

कांहींसं वाऱ्याच्या झोतामुळें व कांहींसं हृदयींच्या भावनांमुळें माझ्या नेत्रांतून अश्रु टिपकले ! मी हृदयाला आवेगानें दाबलं; डोळे नीट पुसले;... विचार करूं लागलों...

पहा ! हें सारंच निसर्गतः किती अनंत...अपार !...छेः, कल्पनाहि करवत नाहीं !...आणि मी ?...मी किती पामर...क्षुद्र ! कुठचा कःपदार्थ ! !...

वाऱ्याच्या झोताबरोबर एक नवीनच विचारलहरी आली–' येथून दिसतं त्या साऱ्याचा...अगदीं साऱ्याचा मी राजा आहें !...नाहीं, इतकंच नव्हे–तर तें सर्व मी—हो...स्वतः मीच आहें ! सर्व माझाच पसारा...मी अनंत...'

...पण दुसऱ्याच क्षणीं मला तें खरं वाटेना ! मी माझं शरीर चाचपून पाहिलं. 'हें इतकं अनंत पसरेल !...छेः, शक्यच नाहीं !'

मग मला असं कां वाटावं ? आणि..आणि..पण शरीर म्हणजेच मी का ?

तेवढ्यांत मला कर्मयोग आठवला. मी वाचलेली गीता बोलूं लागली !... " अजो नित्यं शाश्वतोऽयं पुराणो, न हन्यते हन्यमाने शरीरे ! "

—५—

तोंवर माझ्या पंखांनीं मला एका गजबजलेल्या शहरावर आणून सोडलं होतं !...मी खालीं पाहूं लागलों...

शहरची गजबजलेली वस्ती सहज ओळखूं येते ! मनुष्यनिर्मित कृत्रिम हवेल्या जणूं काय मजकडे वर धांवत येत होत्या; वक्र रस्त्यांतून विसाव्या शतकांतील सुधारलेलीं वेगवान् वहानं धांवपळत होतीं. गिरण्यांचे धुरकटलेले बंब धूर सोडीत होते. सर्व जातींचे व वर्गांचे लोक आपापल्या घाईनें रस्त्यांतून लगबगीनें जातांना, मुंग्यांच्या हालत्या रांगांची मला आठवण होत होती!..

पण त्या सर्वांची ही सारी धडपड कशासाठीं ?...फक्त पोटासाठीं ??... म्हणजे शरीरासाठीं !!...तर मग एकंदरींत हें व्यर्थच ना सारं ??

माझं मन मला सांगूं लागलं—" प्रत्येक मनुष्याला जन्मल्यानंतर, जगांत जगण्यांचा हक्क आहे; त्याला पोट जाळावयासाठीं, अहोरात्र, मरायला नको !.."

पण मग असं कां असावं ?...शरीर जगवण्यासाठीं कोणी मरमर काम करून मरतो; तर कोणी कांहीं न करतां नको इतकं घेऊन नाहक जगतो !...

सृष्टि बापडी सर्वांना पुरून उरेल इतकं उत्पन्न करण्यास सारखी झटते तें ? तें फुटकच तर ! !...

—६—

पहा, हजारों वर्षांपूर्वी सुद्धां, अशाच हजारों मानवांची, जीव जगण्यासाठीं अशीच धडपड चालली असेल !...वीस शतकांची ही सुधारणा व हे शोध, मनुष्यप्राण्याला सुखी करण्याच्या कामीं मुळींच उपयोगी पडूं नयेत ना ??...

आधींच ' उत्क्रांतीमुळें पशूंहून वरच्या दर्जास पोहोंचलेले आम्ही मानव, इतक्या शतकांच्या सुधारणेनंतर, किंवा धर्माचीं बंड करून व त्याला डोक्या-वर नाचवूनही, आपला खरा धर्म—खरं कर्तव्य—शिकलों नाहीं !...

हाय !...उलट तेंच जास्त विसरलों आहों !...

निसर्ग पुष्कळ शिकवतो; पण आपण शिकलं पाहिजे ना !...तो निःस्वार्थी व समदृष्टीचा असला तरी स्वार्थ व त्यापासून उत्पन्न होणारी विषमता समाजाला हातांतील बाहुलीप्रमाणें खेळवीत आहे !...त्याला उपाय काय ?...

खरं कर्तव्य बाजूस राहून, मानवी स्वार्थामुळें उत्पन्न झालेल्या भस्मा-सुरालाच तोंड देण्यासाठीं अगणित आयुष्यं मातीमोल होत आहेत !...

—७—

आळस मनुष्याचा शत्रु खरा; पण उद्योगाची सध्यांची व्याख्या अतिशय नीच व आकुंचित नव्हे काय ?...स्वार्थी जगांतील जडजीवनाच्या पोटार्थी धडपडीला ' उद्योग ' म्हणतात !...पण आत्मिक अनंत जीवन हास्यास्पद व आळसाचं ठरतं ! !...मला चट्कन् रामतीर्थांची आठवण झाली !

...दगडाचे देव दागदागिने व तलम वस्त्रालंकारांनीं नटून, पक्वान्नं ' खातात;' पण त्याचवेळीं एखाद्या कवडीसाठीं किंवा घांसभर भातासाठीं

हाडामांसाचे जिवंत बांधव गोणपटाच्या चिध्यांत उघडे नागडे मरून पडलेले दिसतात ! !...

पण तरीही आम्ही धर्म व विसाव्या शतकांतील सुधारणा यांचा दिमाख दाखवीत असतोंच !...अरेरे...

मला तें सहन करवेना; सभोंवार मला धुकं पसरल्यासारखं झालं ! माझे नेत्र डोळ्यांसमोर दिसणाऱ्या असंख्य हृदयद्रावक देखाव्यांमुळें भरून आले ! ...गात्रं शिथील झालीं; पंख हालेनात...मी भराभर खालीं पडूं लागलों—

—८—

...आणि दुसऱ्याच क्षणीं, मी माझ्या सतंजीवर पडलेलों होतों; डोळ्यांतून अश्रुप्रवाह सुरू होता !...

जागेपणींहि माझ्या तोंडून उद्गार आले—" स्वकर्तव्याचं विस्मरण व स्वार्थ !...हो, स्वार्थ आणि विषमता ! ?"

[१]



# जन्म —स्वर्ग-प्राप्ति

—१—

" खरं ना ? " राघवानें पत्नीचा हात हातीं घेऊन विचारलं.

त्याला बरेच दिवस विचारावयास संकोच वाटत होता. मालतीलाही त्याला आपण होऊन तें सांगायला लाज वाटत होती.

...दोघांचीही छाती आनंदानें धडधडत होती.

मालतीला आंतून गुदगुल्या होत होत्या. पण ' होय ' हे दोन शद्बही उच्चारायचा तिला धीर होत नव्हता; आपल्या पतीच्या डोळ्याला डोळाहि भिडविण्यास ती धजत नव्हती.

पुन्हां तोच प्रश्न; नि हंसतमुखानें पुन्हां तिच्याकडे त्याचं सापेक्ष पाहणं...

तेव्हां तिरक्या डोळ्यानें आपल्या पतिराजांकडे पाहून खालीं पहात तिनें स्मित केलं; मान हलवून ' होऽऽय ' असं अस्पष्ट आवाजांत म्हटलं; नि झटकन् आपला हात सोडवून घेत, लाजून,...तिनें स्वयंपाकखोलींत पळ ठोकली...

राघवाला आनंद झाला. त्याला एकप्रकारची नवी उमेद वाटली. तो हंसत हंसतच आपल्या उद्योगाला निघून गेला.

मालतीच्या डोळ्यांपुढें किती तरी भविष्यकाळचीं चित्रं नाचत होतीं. तिची नाडी जलद चालली होती. हृदय थरारत होतं. मन प्रफुल्ल झालं होतं. तिला आज जिकडे तिकडे आनंदी आनंद दिसत होता.

—२—

त्यादिवशीं तर राघवाची कोण धांदल !...

त्याच्या घरांत पंधरावीस दिवसांपूर्वींच आलेल्या त्याच्या म्हाताऱ्या आजेसासूची आजची गडबड तर कांहीं विचारायलाच नको !...

कारण ?...कारण, सकाळपासून मालतीच्या पोटांत दुखूं लागलं होतं !...

राघवानें जवळच्या कृष्णरावांबरोबर ' हेडक्लार्क 'च्या ' तोंडावर मारण्यास ' ' सिकनोट ' पाठवून दिली ! ( तो स्वतः आजारी नव्हता; पण त्याच्या अर्धांगीचा ' आजार ' त्याच्यावर थोडासा शेकला होता ! ! )

" कुसाताईला घेऊन येतां ना ? " आजेसासू बाहेर येऊन म्हणाली.

" होय,..काल संध्याकाळींच सांगितलं आहे. येईल ती इतक्यांतच ! " तो कांवरा बावरा होऊन म्हणाला.

" पोरीला आतां सोसवत नाहीं ! " आजी सचींत चेहऱ्यानें म्हणाली.

" मग ? आणूं का तिला बोलावून ? ? " पांढरा फटफटीत चेहरा करून राघव गोंधळल्या स्वरांत म्हणाला.

" अं ?...होऽना ! वेळ नको उगीच..."

" निघालोंच " त्यानें लागलीच डोक्यावर टोपी चढविली; तो घराबाहेर बेचैनीनें पळतच सुटला...

—३—

पण कुसाताई घरींच नव्हत्या....

त्याच्या पोटांत धस्स झालं !

" आतां ?...काय माणसं असतात एकेक !...आतां काय करावं ? ? घरांत तर ही अशी अडचण !! आणि...आणि..."

तो लगबग परत फिरला;...बिचकत बिचकतच घरांत शिरला...

"ती भेटली नाहीं घरीं !" मालतीची आजी बाहेर येतांच तो विरघळला

"कोणऽ?...म्हणजेऽ?"

"कुसाताई ! ती घरींच नाहीं तिच्या—आतांऽ ?"...

"म्हणजे ? ती तर तुम्ही बाहेर पडल्याबरोबरच आंत शिरली ! मला वाटलं तुम्हींच तिला पाठविली !"

"आली का ! बरं झालं !!" त्याचा जीव आधीं भांड्यात पडला चटकन्...
"चुकामुकच झाली म्हणायची तिची माझी ! पण...आली नाऽ? चला ठीक.."

आजी हंसत हंसत आंत निघून गेली. आंत मालती होती.

–४–

तो एका खुर्चीवर सचिंत बसला होता. त्याच्याहि पोटांत कालवाकालव होत होती. छाती जोरानें धडधडत होती. मध्येंच डोक्यांत कांहीं नवेच विचार येत; त्याला आनंद होई; तोंडावर एकदम हास्य झळके !...

त्यानें मनगटावरील घड्याळांत पाहिलं; एकदां आंतहि जाऊन आला तो...

त्याला मुळींच करमेना. आंतल्या खोलींत काय चाललंय् हें समजण्याची त्याला फारच उत्कंठा लागली होती.

हातांत घड्याळ घेऊन तो पुन्हां सचिंत मनानें खुर्चीवर बसला !

–५–

एका बाजेवर चिरगुटाचा बिछाना टाकला होता. त्यावर मालती पडून होती. दारं-खिडक्या बंद केलेल्या होत्या.

खाटेजवळच एक खुर्ची होती; त्यावर कुसाताई बसून धीर द्यायला मालतीच्या अंगावरून हात फिरवीत होत्या.

मालतीचा चेहरा साफ पडला होता. केस अस्ताव्यस्त होऊन कपाळावर आले होते. कुंकवाची टिकली वांकडी तिकडी फरपटली होती. या कुशीवरून त्या कुशीवर ती सारखी तळमळतच होती.

कुसाताई आल्यापासून तिला थोडा धीर मात्र आला होता.

" नाहीं होऽ मला सोसवत ! आई गऽऽ ! " ती कुसाताईकडे केविलवाण्या नजरेनें पहात मधूनमधून विव्हळत म्हणे...

" असंऽकाय वेड्याऽसारखं करतां बरंऽ? धीर धरल्याशिवाय कसंऽचालेल ? " कुसाताईंना तिच्या असह्य वेदना पाहून वाईट वाटत होतं; तरी पण आपल्या नेहमीच्या पद्धतीनें हसून त्या तिला धीर देण्यांसाठीं सांगत होत्या...

क्षणाक्षणाला तिला जास्त जास्तच वेदना होत होत्या. कुसाताई मधूनच धीर देत होत्या; पण तिला आराम मात्र नव्हता.

" अगाऽऽईग ! " ती पुन्हां मोठ्यानें ओरडली.

" असंऽकाय बरं करायचंऽतेंऽ? " कुसाताई आपल्या विनोदी स्वभावानुसार म्हणाल्या, " मालतीबाईऽ अहोऽ, आईला असं थोडसं दुःख हें सोसावंच लागतं ! न् उद्यांऽ त्या गोजिरवाण्या बाळाची 'आई' म्हणवून घ्यायला बरं, बरं वाटेल ? तेव्हां नाहीं तुम्हाला या घटकेची आठवण राहणार ! न् कांहीं वर्षांनी त्याच्या लग्नांत 'वरमाई' होऊन मिरवायला न् 'रासन्हाण्या'चा हट्ट धरून बसायला बरा आनंद होईल? तेव्हां तुम्हास हें कांहीं आठवेल तरी का ?"

मालतीला हें सर्व बोलणं ऐकूं येत होतं; पण तिच्या वेदना तशाच चालू होत्या. फार काय, क्षणाक्षणाला तिला जास्तच...

पण तितक्यांत कुसाताईच्या बोलण्यानें तिच्या विचारांनाहीं गति मिळाली होती. कुसाताईनीं रंगविलेलीं दोन चार वाक्यांतील चित्रं...तिच्या मनश्चक्षूं पुढें स्पष्ट दिसत होतीं; दुःखात आनंद वाटत होता. विव्हळतां विव्हळतांही ती त्या भावी चित्रांतच रंगली...

—६—

" कॅऽऽह्यॅऽऽ ! " थोड्यावेळानें तिला आवाज ऐकूं आला.

तिनें डोळे उघडून पाहिलं.

समोरच्या चिरगुटांत गुंडाळलेलं चिमुकलं बालक हालचाल करीत होतं. तिनें त्याला जवळ ओढून घेतलं. तिला मातृप्रेमाचा उमाळा फुटला.

आजीची व कुसाताईची सारखी घालमेल चाललेली तिला दिसत होती.

थोड्या वेळानें कुसाताई तिच्या जवळ आल्या.

तिनें प्रश्नसूचक मुद्रेनें त्यांच्याकडे पाहिलं. आजीहि जवळ उभी होती.

' घरचाऽच गोऽ घरचाऽच ! बाबाचा चेहरा आईच्या वळणावर गेलाय् बरं का ! पण नाक मात्र बापासारखं ! " आजी चिकित्सा करूं लागली.

—७—

मालती समजली. तिचा जीव खालीं पडला. तिला अतोनात आनंद झाला.

पण तिकडे राघव चिंतेंत बसला होता. तान्ह्या मुलाचा आवाज ऐकतांच, त्याचं अर्धं अधिक समाधान झालं.

तो आतां कुसाताईच्या बाहेर येण्याची तेवढी वाट पहात होता.

शेजारच्या रमाबाईनीं, लहान मुलाचा आवाज ऐकून, विचारपूस करण्यासाठीं आपल्या पतिराजांना ओटीवर पाठविलं होतं !...

" काय हो? झाली का सुटका कुटुंबाची ?" ते आंत येत राघवाला म्हणाले.

" होय, नुकतीच !" तो धडधडत्या अंत:करणानें तुटक तुटक म्हणाला.

" काय बातमी ?...पेढे कीं बर्फी ? "

" अझून समजलं नाहीं ! येतील इतक्यांत कुसाताई बाहेर ! " राघव म्हणायचं म्हणून म्हणाला. बाकी त्याचं लक्ष तर आंत लागलं होतं सारं !...

रमाबाईंचे पतिराज विन्मुख परतले; त्यांच्या पत्नीला फारशी माहिती मिळाली नाहीं. त्या चुटपुटल्या.

—८—

थोडा वेळ अंतःकरणाची चलबिचल सोसल्यावर, आंतील सर्व काम आटोपून कुसाताई बाहेर येतांना राघवाला दिसल्या.

साबणानें हात धुतां धुतां त्या म्हणाल्या, " कांहीं काळजी करण्याचं कारण नाहीं, बरंऽ काऽ ! बाळबाळंतीण दोघंही खुशाल विश्रांति घेत आहेत. मीं औषधाविषयीं आजींना सांगितलंच आहे सारं..."

" बाळ बरं आहे ना ? " राघव चांचरत म्हणाला.

"हो, खुशाल आहे बरं तुमचा मुलगा !" कुसाताई हंसत हंसत म्हणाल्या.

राघवाला पाहिजे ती माहिती मिळाली.

" जन्माचा नक्की वेळ ? " राघवानें कुसाताईंना उत्सुकतेनें विचारलं.

" दहा वाजून अकरा मिनिटं ! " कुसाताई पर्स हातीं घेऊन जावयास निघतांना म्हणाल्या.

—९—

राघवानें तें टिपून घेतलं. टोपी घालून त्यांना पोहोंचवायला तो दारापर्यंत गेला. दाराजवळ त्यानें त्यांच्या हातांत कायसं ठेवलं.

" मी संध्याकाळीं येईनच !" त्या जातांना त्याला आश्वासून म्हणाल्या.

" होऽ होऽ !" राघव गोंधळी चेहऱ्यानें हंसत म्हणाला.

तो परत आला व खुर्चीवर बसला. त्याला हायसं वाटलं. आनंद झाला !...

नि घरांत प्रत्येकाच्याच तोंडावर आनंद झळकत होता, त्या दिवशीं ! !...

आशा !...आशा,...महान् खरीच !......




# [१०]

## — महा प्रयाण

—१—

" भाऊऽ, मोसंब्याचा रस घालूं का तोंडांत ? " उशाशीं बसलेला त्यांचा मोठा मुलगा म्हणाला.

" नकोरे बाबाऽ कांहीं नको अगदीं !" ते उसातत उसातत कण्हले.

पण त्यांचं न ऐकतां, चार पांच घोंट त्यांच्या घशाखालीं त्यानें उतरवलेच.

भाऊंनीं प्रस्थान ठेवलं होतं. अखेरच्या प्रवासाचीच ती तयारी होती.

तसं म्हटलं, तर भाऊचं काय वाईट होतं ?

बरे तीन शिकले सवरलेले मुलगे; मुलींचीं लग्नं होऊन त्या आपापल्या घरीं; मुलांना त्यांच्या मनाजोगत्या बायका मिळून त्यांना आनंदीं व खेळकर मुलं; त्यांचंही आतां वय झालेलं होतं; सत्तरीच्या वर गेले असल्यामुळें, त्यांना आतां मरण म्हणजे आवश्यकच वाटत होतं.

एखादा नातू थट्टेनें—" भाऊऽ–आजोबांना शंभर वर्षे आयुष्य !" असं कधीं म्हणे; त्यावर ते आपल्या हलत्या मानेला झटका देऊन उत्तरत—"नकोरेऽ बाबाऽ! मला काय करायचंय् ? तुम्हालाच घ्या तें ! यमराजाची माझ्यावर केव्हां कृपा होतेय् नकळे ! वाट पहातोंय् मी..."

पण खरीच त्यांची तशी इच्छा होती का कोणास ठाऊक ?...

—२—

अलीकडे मात्र त्यांची वयाच्या मानानें असलेली दगडी सशक्तता ढांसळत

चालली होती. ते हल्लीं वरचेवर आजारी पडत. गेल्या दीड दोन महिन्यांत तर ते बिछान्यावरून उठलेहि नव्हते.

दर दिवशीं त्यांची शक्ति थोडी थोडी कमी होत चालली होती. आतां त्यांना कांहीं पचेनासं झाल्यामुळें दूध, ताक, मोसंब्याचा रस वगैरेंवरच ते अखंडपणें रहात असत.

गेल्या आठवड्यांत तर प्रकृति जास्तच बिघडली; आतां त्यांना स्वतः होऊन, या कुशीवरून त्या कुशीवरही होतां येत नव्हतं. आपल्या जिवाला ते अगदीं साफ कंटाळले होते. मधून मधून ते सुस्कारा टाकून अस्पष्ट आवाजांत म्हणत, ' देवाऽ, सोडीव रे आतां ! '

डॉक्टरनेंहि ' आजची संध्याकाळ जवळ जवळ शेवटची ' असंच सांगितलं होतं; घरांतील मंडळींचं आपापसांत हळूहळू कुजबुजणं चाललं होतं.

—३—

शेवटीं डॉक्टर पुन्हां आले. त्यांनीं पुन्हां तपासलं.

" काऽय ?" मोठा मुलगा डॉक्टरना आशापूर्ण चेहऱ्यानें विचारूं लागला.

" आशा नाहीं !" डॉक्टरांनीं तोंड वांकडं करून मानेनें नन्ना केलं.

" डॉक्टर, काय हातीं असेल तें करा; कोणती कसूर नको ! "

" नानासाहेब ! अहोऽ, पिकलं पान गळून पडल्याशिवाय रहातं का ?... आणखी किती दिवस आतां आशा ? ते काय तुमच्या हयातीला पुरणार ?"

" तें खरं हो ! पण..."

" होय ! पण...प्रयत्नाला यश येणं अवाक्याबाहेर गेलं आहे आतां..."

थोड्या वेळानें डॉक्टर निघून गेले. त्यांनीं सांगितलं खरं, पण नानासाहेबांचं पुरं समाधान झालं नव्हतं. आशावाद हा मनुष्याचा मुख्य गुणधर्म!

—४—

घरांतील सर्व मंडळींच्या मनोवृत्ती खळबळल्या होत्या. त्यांच्या कुज-

बुजण्याचा आवाज भाऊंच्या कानावर अस्पष्ट आदळत होता. आणि संध्याकाळीं तर भाऊंची प्रकृति अतिशयच बिघडली होती. त्यांना आतां नीट श्वासही घेतां येईनासा झाला होता.

बिछान्याजवळ दोघे मुलगे; नि त्यांचे मोठे मोठे मुलगेही आजोबांना पहावयास त्यांच्या समोंवतीं...

मध्यभागीं बिछान्यावर भाऊ निश्चल पडले होते.

त्यांचं रुंद कपाळ; वाढलेल्या हजामतीमुळें दिसणारं पांढरं शुभ्र डोकं; तोंडांत दांत नसल्यामुळें जरासं पेंचलेलं तोंड; वाढलेली पांढरी दाढी व मोठे कल्ले असलेली मिशी; अशक्ततेनें गालांचीं वर आलेलीं हाडं;...या सर्वांमुळें त्यांचा एकंदर चेहरा जरा जास्तच उग्र, भयाण दिसत होता.

अशक्ततेमुळें त्यांना हातपायहि हालवितां येत नसले तरी डोळे मात्र चोहीं-कडे गरगर फिरत होते.

—५—

त्यांची दृष्टी नानासाहेबांकडे वळली—

त्यांच्यापुढून एक एक जुनी चित्रं जाऊं लागलीं...

नानाचं बारसं, त्याच्या बाललीला, उनाड मुलगा म्हणून प्रसिद्धी, नंतरची त्याच्या जीवनांतील क्रांति; हुशार मुलगा म्हणून झालेली त्याची ख्याति; मॅट्रिकमध्यें पहिला नंबर आल्यावेळीं वाटलेलं समाधान; नंतर दोन वर्षांनीं इंजिनिअरिंगसाठीं त्याचं विलायतला गमन व त्या वेळचं दुःख; परत आल्यावर मिळालेली सरकारी मोठी नोकरी;...त्याच्या लग्नाचा थाट, भाऊं-च्या पहिल्या नातवाचा जन्म, '...

ते सर्व देखावे चित्रपटाप्रमाणें भरभर त्यांच्या डोळ्यांसमोरून निघून गेले.

—६—

त्यांची दृष्टी दुसऱ्या मुलाकडे वळली...

वामनरावांचा चेहरा आपल्या आईसारखा होता. त्यांना लगलीच आपल्या बायकोची आठवण होऊन त्यांच्या डोळ्यांतून खळकन् पाणी आलं. तिची शेवटची स्थिती; 'मागं माझी आठवण म्हणून बाळाला ठेवून जात आहे' असं म्हणून चिमुकल्या वामनाचा हात आपल्या हातांत देते-वेळची तिची करुण दृष्टी; शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या बायकांनीं 'कसा गुलाम मातृमुखी आहे पहा! हीं भाग्यवंताचीं लक्षणं हो!!' असं म्हणून वामनचं त्यावेळीं केलेलं कौतुक; निरनिराळया वक्तृत्वोत्तेजक संस्थांतून त्याला उत्तम वक्ता म्हणून मिळालेलीं बक्षिसं,..त्याला मिळालेला शहरांतील पुढारीपणा; उत्तम वकील म्हणून थोड्याच दिवसांत त्यानें संपादलेली कीर्ति...

त्याच नादांत त्यांनीं आपल्या तिसऱ्या मुलाकडे पाहाण्यास दुसरीकडे दृष्टि फिरविली. इतक्यांत तो विलायतेंतून परत यायला अजून दहा दिवसाचा अवकाश असल्याची त्यांना आठवण झाली. "अरेरेऽ, पद्माकराची न् माझी भेट होणार नाहीं तर." त्यांच्या मनांत विचार आले. उद्गार बाहेर पडणं शक्य नव्हतं. वाचा आतां त्यांच्या ताब्यांत नव्हती.

पण तेवढ्यांत त्यांनीं आपल्या नातवांकडे दृष्टी फिरविली. सर्वांकडे पाहून झाल्यावर अखेर त्यांना बरं वाटलं.

—७—

त्यांच्या शक्तीला सारखी ओहोटी लागली होती. शरिराचा खालचा अर्धा अधिक भाग आतां त्यांच्या साफच आटोक्याबाहेर गेला होता.

हात हलवण्यासारखे होते. पण शक्ति इतकी कमी...कीं, स्वतः हालवलेला हात त्यांना स्वतःलाच दिसत नव्हता.

त्यांना समजून आलं, कीं, आतां आपण ज्याची इतके दिवस वाट पहात होतीं तोच क्षण जवळ येत आहे.

तरी पण त्यांना कां कोणास ठाऊक एकदम भीति वाटली. सर्वांना त्यांचं शरीर एकदम मोठ्यानें हलल्यासारखं वाटलं. सर्वजण त्यांच्याकडे सरकून टवकारून पाहूं लागले.

" आला वाटतं डॉक्टरांच्या सांगण्याप्रमाणं तो संध्याकाळचा अखेरचा क्षण ! " नानासाहेब जरा रडक्या स्वरांत म्हणाले.

वामनराव कांहींच बोलले नाहींत.

दाराजवळ उभ्या असलेल्या त्यांच्या बहिणींनीं डोळ्याला पदर लावले.

—८—

भाऊंचा विचार मात्र चालूच होता.

" आतां आपलं काय आहे ? या जगांतून जायला काय हरकत आहे ? संसार झाला ! मुलं झालीं ! त्यांचा विद्याभ्यास झाला. ते उद्योगधंद्याला लागले. ते सुखानें संसार करूं लागून त्यांना मुलंही झालीं ! तींहि मार्गाला लागलीं. आतां आपण आणखी किती दिवस जगण्याची आशा करावयाची ? हें त्रांगडं संपणार तरी केव्हां ? छेः !...कांहीं नाही ! ही वेळ आपल्या मोक्षाचीच आहे. या शरीराला आतां मी सोडून जाणार ! हो जाणार..."

पण मग, त्यांना पुन्हा भीति वाटली. शरीरानें पुन्हा एकदां उसळी मारली. जीव जाण्यास बराचसा कबूल; तरी इतकं जुनाट शरीर त्याला एकदम सोडीना. त्याची जिवाबरोबर लठ्ठालठ्ठी सुरूं झाली.

तोंच त्यांच्या तोंडावर एक माशी बसलेली त्यांना दिसली;...ती उडविण्या-साठीं त्यांनीं हात वर केला;...तसं त्यांना वाटलं. पण ती खट्याळ माशी त्यांच्या तोंडावरून कांहीं उठेना. त्यांनीं जवळ बसलेल्या नानासाहेबांना तें सांगितलं;...नव्हे, तसं त्यांना वाटलं. पण कोणी ऐकलंच नाहीं.

'अरेच्या ! इतका बेफिकिरपणा अंऽ ?' त्यांना थोडा राग आला. उप-हासात्मक ते हसले; (त्यांना तसं वाटलं).

" आतां तरी यांचे डोळे उघडतील ! छे ! काय ही मगरूरी ? माझी कोणीच काळजी घेत नाहीं ! तोंडदेखलेपणा अंऽ ? आतां मला म्हाताऱ्याला घेऊन काय करायचंय् त्यांना ? " ते मनांत म्हणत होते.

—९—

" काय हाल होत असतील माणसाचे हे शेवटीं शेवटीं ! " वामनराव कळवळून हळूच म्हणाले, "या हालांपेक्षां...जातील एकदांचे भाऊ तर बरें !..."

भाऊंना ते शेवटचेच शब्द ऐकूं आले; त्यांना संताप आला—" अरेरे, वामनच हें बोलूं लागला काय ? काय हा कृतघ्नपणा ! मी मरावं असं याला वाटतं, अंऽ ?—बरोबर; आतां माझ्याकडून आणखी कांहीं मिळण्याची आशाच नाहीं त्यांना कसली ! माझ्या म्हातारड्याच्या हाडांचा यांना आतां काय उपयोग ?...आतां मी मरायचंच तर ?"

मरणाची गोष्ट निघतांच, शक्ति एक करून, शरीरानें पुन्हां मोठ्यानें उसळी मारली. जणूं, मोठ्या मिनतवारीनें जीवाला तें सांगत होतं. " काय बरं हा वेडेपणा ! इतके दिवस आपण एकमेकांना धरून हजारों कृत्यं केलीं; एकमेकांचं भिन्नत्व आपल्याला वाटलंसुद्धां नाहीं. आणि आतां इतका माझ्यावर रोष करून दूर दूर कां चाललास ??"

सर्वजण दुःखी उत्कंठेनें भाऊसाहेबाकडे पहात होते.

" बस्सऽ !...ठरलाच विचार ! आतां जायचं ! एके ठिकाणींच अडकून रहाण्यांत काय अर्थ आहे ? 'वासांसि जीर्णानि यथा विहाय,..." भाऊंचा वेदान्त जागा होऊन बोलूं लागला...

—१०—

" हं हं...वेड्यासारखं काय हें ? चाललाऽस ? तुझा पद्माकर भेटलाऽका तुला ? पास होऊन कलेक्टर तरी होऊंऽ दे त्याला ! न् त्याचं लग्न ??

" हें: ! वेडा रेऽ वेडा ! कसल्या मूर्ख पोरकट आशा घेऊन बसलास ? तुझ्याशिवाय त्याचं आयुष्य जणूं काय पुढं चालूं होणारच नाहीं !...

" मग जायचं ना हें शरीर सोडून ?..."

शरीर पुन्हां एकदां खडबडून हललं. त्याची समजूतच होईना.

१०६५
का.वा.

—११—

"चाललेऽ वाटतं?" कोणी तरी कुजबुजलेलं ऐकू आलं भाऊंना–

"कोण तेंऽ? कोण इतकं माझ्या जिवाला कंटाळलंय्? नानाऽ? कुठं आहे? पाहूं?...अरे, पण हेंऽ काय?...मला कांहीं दिसतच नाहीं तें!..."

भाऊंनीं हात वर करण्याचं मनांत आणलं, पण आतां शरीर ताब्यांत नव्हतं!...ते व भाऊ निरनिराळे झाले होते...

"हाऽ वेड्या! अजून तुझा मोह सुटत नाहीं नाऽ? आतां तुला पश्चाकर कसला..

"शरीर खूप सांगेल!...पण त्याच्यावर तुझा ताबा चालायला शक्ति...

"आणि तूं राहिलास शरीराला असाच धरून,...तरी सभोंवतीं लोक कुठं एवढे तुझ्या जगण्याविषयीं उत्सुक आहेत?...

"सर्व लोक तुझ्याबद्दल निराश!...न् तूंच स्वतःची आशा करतोस?"

—१२—

"सूत हालत नाहीं बरं का?" भाऊंना खोल...अस्पष्ट आवाज ऐकूं आला.

"पाहिलंस? झाली आतां खात्री??...जा?...

"मग ठरला ना तुझा विचार? जायचं ना शरिराला सोडून?"

पुन्हां शरीर दचकलं. उरली सुरली सर्व शक्ति एकवटून त्यानें हालचाल केली.

आणि हीच ती शरीराची शेवटची धडपड!...मग त्यानंतर भाऊसाहेब कायमचे निश्चल झाले!—भाऊ माती...हो...माती झाले!...

झालं–जीव व शरीर यांची कायमची फारकत झाली!

पण ती प्रचंड आशा कुठं गेली?

कदाचित् जीवाला धरूनच गेली असावी!...जीवाला??–

कोण जाणें!–पण ती शेवटपर्यंत ...

IRBK-0104065

IRBK-0104065

## —रघुवीर सामंत संपादित—

★

★

**आपल्या वाढत्या बाळांच्या हातीं द्या!**

जुन्या नऊ पुष्पांच्या गटाची दुसरी आवृत्ति तयार होत आहे.

नव्या पद्धतशीर पुस्तकांचे गट
छापून तयार होत आहेत.
लौकरच प्रकाशांत येतील.

**मराठींतील मानसशास्त्रीय दृष्टीनें तयार केलेलें बालवा**